अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १४१ । गुरूवार ५ मार्च २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## शरद पवारच राज्यसभेचे उमेदवार




मुंबई :राज्यसभेच्या उमेदवारीसाठी अर्ज भरण्यास आज स्वतः शरद पवार येण्याची शक्यता कमी असून विधिमंडळातील अधिकारीच सिल्व्हर ओक निवासस्थानी जाणार असल्याची माहिती आहे. शरद पवार यांच्या नावाला अखेर महाविकास आघाडीने पाठिंबा दिला असून काँग्रेसकडून ते जाहीर करण्यता आलं आहे. तर, संजय राऊत यांनीही ट्विट करुन महाविकास आघाडी एक राहिल, असे म्हणत शरद पवारांच्या नावासा पाठिंबा असल्याचे सूचवले आहे. त्यामुळे, शरद पवार हेच महाविकास आघाडीचे राज्यसभेचे उमेदवार असणार आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबत घोषणा केली.

## महत्त्वाचे..

### उन्हाचा चटका वाढला : पारा ३८ अंशावर

दिवसेंदिवस राज्यात उन्हाचा चटका वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या उन्हाचा लोकांना मोठा त्रास होत आहे. मुंबईत देखील तापमनात वाढ होत असल्याचं दिसत आहे.



मुंबईतील सांताक्रुज वेधशाळेत आज कमाल तापमान ३८.७ अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं आहे. कुलाब्यात कमाल तापमान ३५.७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. उद्या देखील मुंबईतील तापमान सरासरी ३७ अंश सेल्सिअस वर राहण्याची शक्यता आहे. राज्यात उन्हाचा चटका वाढत आहे. तापमानात वाढ झाल्याने दुपारी उकाडाही जाणवत आहे. कोकणात उष्ण आणि दमट हवामान होते. तर राज्यातील उन्हाचा चटका वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला होता. त्यानुसार तापमानात वाढ होत असल्याचं चित्र दिसत आहे. कोकणातील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात उष्ण आणि दमट हवामान होते. उद्याही पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्यात उष्ण आणि दमट हवामानाचा अंदाज देण्यात आला आहे.

## जामखेड हादरले...

# कुख्यात गुंड सागर मोहळकरवर भररस्त्यात अंदाधुंद गोळीबार

### सात राऊंड फायर; चार गोळ्या शरीरात घुसल्या । प्रकृती चिंताजनक । टोळीयुद्धाची शक्यता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड शहरात आज संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास टोळीयुद्धाच्या छायेतून भीषण गोळीबाराची घटना घडली. शहरातील नुराणी कॉलनी परिसरात कुख्यात गुंड सागर मोहळकर याच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी अंदाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यात मोहळकर गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सात राऊंड फायर करण्यात आले, त्यापैकी चार गोळ्या त्याच्या शरीरात घुसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.



सागर मोहळकर हा नुराणी कॉलनी परिसरातून जात असताना दबा धरून बसलेल्या हल्लेखोरांनी अचानक त्याच्यावर पिस्तुलातून गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात मोठी पळापळ झाली. मोहळकर रक्ताच्या थारोळ्यात कोसळताच हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले. स्थानिकांनी आणि पोलिसांनी तातडीने धाव घेत त्याला ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने प्राथमिक उपचार करून त्याला पुढील उपचारासाठी तातडीने नगरला हलवण्यात आले आहे. सागर मोहळकर याची जाम खेड शहर व तालुक्यात मोठी दहशत होती.

त्याच्यावर खुनाचा प्रयत्न (कलम ३०७) यासह अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. जामखेड पोलिसांनी त्याला नाशिक मध्यवर्ती कारागृहात रवानगी केली होती. मात्र, काही दिवसांपूर्वीच तो जामिनावर बाहेर आला होता. तो बाहेर येताच त्याच्यावर हा जीवघेणा हल्ला झाल्याने यामागे जुन्या वैमनस्यातून किंवा टोळीयुद्धातून हा प्रकार घडला असल्याची चर्चा सुरू आहे.

घटनेची माहिती मिळताच जामखेड पोलीस दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. हल्लेखोरांनी सात वेळा गोळ्या झाडल्या, त्यातील चार गोळ्या मोहळकरच्या अंगात आहेत. हल्लेखोरांना पकडण्यासाठी जामखेड पोलिसांनी विशेष पथके नियुक्त केली असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू आहे.

**शहरात तणावपूर्ण शांतता**

भरवस्तीत आणि वर्दळीच्या वेळी झालेल्या या गोळीबारामुळे जामखेड शहर आणि तालुक्यात भीतीचे वातावरण पसरले आहे. गुन्हेगारीच्या या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण असून, पोलीस प्रशासन आता या गुंडांच्या टोळ्यांवर काय कडक कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## राज्यसभा निवडणूक :

# भाजपकडून विनोद तावडे, आठवलेंसह चौघांना संधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यसभेच्या निवडणुकीसाठी भाजपने महाराष्ट्रातील उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. रामदास आठवले, विनोद तावडे, रामदास वडकुते, माया इवनाते यांना भाजपकडून राज्यसभेची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

राज्यसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातून निवडल्या जाणाऱ्या ७ जागांसाठी भाजपने आपले उमेदवार जाहीर केले आहेत. भाजपकडून रामदास आठवले, विनोद तावडे, माया चिंतामण ईवनाते आणि रामराव वडकुते यांना उमेदवारी दिली आहे. महाराष्ट्रातील संख्याबळानुसार भाजपचे ४ उमेदवार हमखास निवडून येऊ शकतात. त्यानुसार भाजपने आपले उमेदवार जाहीर केले आहेत. कालच भाजपने इतर राज्यातील उमेदवार जाहीर केले होते. त्यावेळी महाराष्ट्रातून कुणाला उमेदवारी मिळणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या.

भाजपकडून सोशल इंजिनिअरिंग साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मराठा, आदिवासी, ओबीसी आणि मागासवर्गीय समाजाला चारही उमेदवारांच्या माध्यमातून संधी देण्याचा प्रयत्न भाजपने केला आहे. सोबतच, यादीतून प्रादेशिक समतोल देखील राखण्याचा प्रयत्न भाजपने केल्याचं दिसून येतंय. विदर्भ, मराठवाडा, कोकणातील उमेदवारांना भाजपकडून संधी देण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने १० राज्यांमधील ३७ राज्यसभेच्या जागांसाठी निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या. या ३७ जागांसाठी १६ मार्च रोजी निवडणुका होणार आहेत. रिक्त जागांपैकी १२ जागांवर एनडीए आहे, तर २५ जागांवर विरोधी पक्षांचा समावेश आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक (७) जागा आहेत, त्यानंतर तामिळनाडू (६) आणि पश्चिम बंगाल आणि बिहार (प्रत्येकी ५) आहेत. राज्यसभेसाठी उद्या म्हणजे ५ मार्चपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत आहे.

**शिवसेना शिंदेंकडून ५ नावांची चर्चा**

शिवसेना शिंदे गटाकडून माजी खासदार राहुल शेवाळे यांचं नाव राज्यसभेसाठी जवळपास निश्चित मानलं जात आहे. तर राहुल शेवाळे यांचं नाव निश्चित झालं असलं तरी पक्षातून ज्योती वाघमारे, शायना एनसी, संजय निरुपम यांचीही नावं चर्चेत आहे. तर पक्षातील ज्येष्ठ नेते गजानन किर्तीकर यांनीही राज्यसभेवर जाण्याची इच्छा पक्षश्रेष्ठीकडे दर्शवली आहे

## बारामती अन् राहुरीची पोटनिवडणूक एकत्रच

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सध्या राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून राज्यसभेची निवडणूकही जाहीर झाली आहे. त्यातच, उमेदवारी अर्ज भरण्यासाठी शेवटचे काही दिवस उरले असल्याने राजकीय पक्षाकडून उमेदवारांच्या नावाची यादी जाहीर करण्यात येत आहे. राज्यसभेनंतर राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या पोटनिवडणुकीची घोषणा होऊ शकते. त्यासाठी, राहुरी मतदारसंघातून उमेदवार कोण? याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. गेल्याच महिन्यात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्याने बारामतीमध्येही पोटनिवडणूक जाहीर होणार आहे. त्यामुळे, अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी आणि बारामतीची पोटनिवडणूक जाहीर होणार असून उमेदवारीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**बारामतीत सुनेत्रा पवार, राहुरीत अक्षय कर्डीले यांना संधी?**

बारामती विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीसाठी सुनेत्रा पवार यांचे नाव निश्चित मानलं जात आहे. कारण, त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाचा पदभार स्वीकारत कामकाजही सुरू केलं आहे. तर, राहुरी विधानसभा **(पान ४ वर)**

## असह्य नकार... प्रेयसीच्या खोलीत तिच्या डोळ्यादेखत घेतला गळफास!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** प्रेयसीने लग्नास नकार दिल्याने रागाच्या भरात एका तरुणाने तिच्यासमोरच गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि. ३ मार्च) दुपारी शहरातील शिवाजीनगर परिसरात घडली. या घटनेने संपूर्ण शहर हादरले असून, कमावत्या तरुणाच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मृत तरुणाचे नाव सागर सखाराम निंबाळकर (वय २५, रा. श्रीगोंदा स्टेशन परिसर) असे आहे. तो एचडीएफसी बँकेत कार्यरत होता. प्राथमिक माहितीनुसार, सागर दुपारी साडेबारा ते एक वाजण्याच्या सुमारास शिवाजीनगर येथील एका भाड्याच्या खोलीत राहणाऱ्या महाविद्यालयीन तरुणीच्या खोलीत गेला होता. काही वेळातच त्याने दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. घटना घडताच तरुणी प्रचंड धक्क्यात गेली आणि परिसरात एकच खळबळ उडाली.

स्थानिकांच्या मदतीने सागरला तात्काळ श्रीगोंद्यातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. प्रेयसीने लग्नास स्पष्ट नकार दिल्याने हताश होऊन त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. आत्महत्येपूर्वी कोणताही लिखित सुसाइड नोट सापडलेली नाही, परंतु वैयक्तिक संबंधांमुळे निर्माण झालेल्या भावनिक तणावामुळे ही घटना घडल्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे.

श्रीगोंदा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल तरटे करत आहेत. घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा केला असून, तरुणीची अधिक तपासासाठी नोंद घेण्यात आली आहे. या घटनेमुळे शिवाजीनगर परिसरात शोककळा पसरली असून, तरुणांच्या भावनिक आरोग्याकडे आणि प्रेमसंबंधांतील तणावाकडे लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

**भावनिक असंतुलनाचा प्रश्न...**

सागर हा कुटुंबातील एकमेव कमावता सदस्य असल्याने त्याच्या निधनाने कुटुंबीय हवालदिल झाले आहेत. या प्रकारामुळे युवा पिढीतील भावनिक असंतुलन आणि निर्णयक्षमता यावर समाजमनात प्रश्न उपस्थित झाले आहेत.



## इराण-इस्रायल युद्धात कांदिवलीच्या दीक्षित सोलंकीचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** इराण आणि इस्रायल-यूएस यांच्यातील वाढत्या संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय सागरी मार्गांवर धोका वाढला आहे. या तणावाची थेट झळ आता मुंबईला बसली आहे. ओमानच्या मस्कत किनारपट्टीजवळ गल्फ ऑफ ओमानमध्ये एका मालवाहू ऑईल टँकरवर ड्रोन बोटीने हल्ला झाला. या हल्ल्यात मुंबईतील कांदिवली येथील रहिवासी दीक्षित सोलंकी (वय २५) याचा मृत्यू झाला. हा पहिला भारतीय बळी असून, यामुळे भारतीय खलाशांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

मूळचा गुजरातच्या दीव येथील असलेला दीक्षित सोलंकी काही वर्षांपूर्वी व्यवसायासाठी मुंबईत आला होता. तो कांदिवलीत राहत होता आणि 'एमकेडी व्योम' या मार्शल आयलंड्स ध्वजाखालील ऑईल टँकरवर क्रू मेंबर म्हणून काम करत होता. ओमानच्या मस्कत किनारपट्टीपासून सुमारे ५२ नॉटिकल मैल अंतरावर हा टँकर स्फोटकांनी भरलेल्या ड्रोन बोटीच्या हल्ल्याचा बळी ठरला. हल्ल्यात टँकरच्या मुख्य इंजिन रूममध्ये भीषण स्फोट आणि आग लागली, ज्यात दीक्षितचा जागीच मृत्यू झाला. **(पान ४ वर)**

**भारतीय दूतावासाने दीक्षितच्या मृत्यूवर शोक व्यक्त केला असून, परिवाराला सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. या हल्ल्यांमुळे जागतिक तेल पुरवठा आणि सागरी सुरक्षेवर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.**




## निळवंडे कालव्यात बुडून आत्या-भाच्याचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** संगमनेर शहरालगत असणाऱ्या माझे घर सोसायटी घुलेवाडी शिवारातील अमृतवाहिनी नीडो इंटरनॅशनल स्कूल च्या पाठी मागील बाजूस असणाऱ्या निळवंडे डाव्या कालव्यामध्ये पाय घसरून पडलेला अथर्व राहुल बागड (वय ८) याला वाचवण्यासाठी गेलेल्या त्याच्या आत्या ज्योती प्रकाश आवारी (वय ४२) या आत्या भाच्याचा निळवंडे कालव्याच्या पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला.

घुलेवाडी परिसरातील निडो इंटर नॅशनल स्कूलच्या पाठीमागील बाजूस असलेल्या निळवंडे कालव्या जवळ ज्योती आवारी कोमल बागड स्वरा बागड व अथर्व बागड हे सर्व जण कपडे धुण्यासाठी गेले होते. एकीकडे महिला कपडे धूत असताना अथर्व निळवंडे डाव्या कालव्याच्या दिशेने पुढे गेला अन् तो कालव्यात पडला हा आवाज ऐकून अथर्वची आत्या ज्योती आवारी यांनी क्षणाचाही विलंब न करता आपल्या भाच्याला वाचवण्यासाठी थेट कालव्यात उडी घेतली. मात्र कालव्यातील पाण्याची खोली आणि पाण्याच्या वेगाचा अंदाज न आल्याने दोघेही पाण्यात बुडाले. ज्योती यांची भावजय कोमल यांनी आरडाओरडा करताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्याचवेळी त्या ठिकाणी रुग्णवाहिका आली. रुग्णवाहिकेच्या चालकाने दोघांना बाहेर काढून वाचवण्याचा प्रयत्न केला. दोघांना उपचारासाठी घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्या दोघांचा ही मृत्यू झाला असल्याचे घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जाहीर केले. या बाबत विशाल भास्कर बागड यांनी शहर पोलिसात दिलेल्या खबरीवरून अकस्मात मृतींची नोंद करण्यात आली. या दोघांवर शोकाकुल वातावरणात होळीच्या दिवशीच अंतिम संस्कार करण्यात आले.



**ऐन होळी सणाच्या दिवशी या दुर्दैवी घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. ज्योती आवारी ह्या काही वर्षापासून आपल्या भावाकडेच राहत होत्या. तर अथर्व हा निडो स्कूलमध्ये इयत्ता दुसरीच्या वर्गात शिकत होता. आत्या आणि भाचा या दोघांचाही दुर्दैवी मृत्यू झाल्यामुळे घुलेवाडी व माझे कर सोसायटी परिसरात एकच शोक काळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.**



# संपादकीय

## जागतिक शांततेच्या उंबरठ्यावरचा धोका

मध्यपूर्वेतील आगीने आता जागतिक स्तरावर पसरण्यास सुरुवात झाली आहे. इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील संघर्षाने पूर्ण युद्धाचे रूप धारण केले असून, हे युद्ध केवळ या तीन देशांपुरते मर्यादित राहिलेले नाही. गेल्या काही दिवसांत इराणवर अमेरिका आणि इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यांनी शेकडो नागरिकांचे बळी घेतले आहेत, तर इराणच्या प्रत्युत्तराने खाडी राष्ट्रांवरही हल्ले सुरू झाले आहेत.

या युद्धाच्या झळा आता भारतासह जगातील इतर देशांनाही बसू लागल्या आहेत. तेलाच्या किंमतीत झालेली वाढ, पुरवठा साखळीतील व्यत्यय आणि आर्थिक अनिश्चितता यामुळे जगभरातील अर्थव्यवस्थेवर परिणाम होत आहे. हे युद्ध केवळ राजकीय किंवा लष्करी संघर्ष नाही, तर ते जागतिक शांतता आणि स्थिरतेसाठी एक मोठा धोका आहे.

या युद्धाची पार्श्वभूमी दीर्घकाळापासूनची आहे. इराण आणि इस्रायल यांच्यातील शत्रुत्वाची मुळे १९७९ च्या इराणी क्रांतीपर्यंत जातात, जेव्हा आयतोल्ला खोमेनी यांच्या नेतृत्वाखाली इस्लामिक राज्य प्रस्थापित झाले. इराणने इस्रायलला 'लहान शैतान' म्हणून संबोधले आणि त्याच्या अस्तित्वाला नाकारले. दुसरीकडे, अमेरिका आणि इराण यांच्यातील संबंध १९५३ च्या अमेरिकन-ब्रिटिश समर्थित राज्यक्रांतीनंतर बिघडले, ज्याने शाह मोहम्मद रझा पाहलवी यांना सत्ता दिली होती. १९७९ नंतर इराणने अमेरिकेला 'मोठा शैतान' म्हटले आणि दोन्ही देशांतील राजकीय तणाव वाढला.

इराणच्या अणुकार्यक्रमाने हे तणाव अधिक गंभीर बनवले. २००२ मध्ये इराणच्या गुप्त अणुकार्यक्रमाची माहिती उघड झाल्यानंतर, अमेरिका आणि इस्रायलने इराणला अणुबॉम्ब विकसित करण्यापासून रोखण्यासाठी प्रयत्न सुरू केले. २०१५ च्या 'जॉइंट कॉम्प्रिहेन्सिव्ह प्लॅन ऑफ ॲक्शन' कराराने इराणच्या अणुकार्यक्रमावर निर्बंध घातले, पण २०१८ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हा करार मोडला आणि इराणवर कठोर निर्बंध लादले. अ य ा पार्श्वभूमीत, इराणने 'ॲक्सिस ऑफ रेझिस्टन्स' नावाची युती तयार केली, ज्यात हिझबुल्ला (लेबनॉन), हमास (पॅलेस्टाइन), हौथी (येमेन) आणि इराकी मिलिशिया यांचा समावेश आहे. हे गट इराणच्या समर्थनाने इस्रायल आणि अमेरिकन हितसंबंधांवर हल्ले करतात. ७ ऑक्टोबर २०२३ च्या हमासच्या हल्ल्याने इस्रायल-हमास युद्ध सुरू झाले, ज्याने इराणच्या प्रॉक्सी गटांना सक्रिय केले. २०२४ मध्ये इराणने इस्रायलवर थेट मिसाइल हल्ले केले, ज्याने संघर्ष अधिक तीव्र झाला. २०२५ मध्ये एक लहान युद्ध झाले, पण ते थांबले. मात्र, २०२६ पर्यंत इराणच्या अणुकार्यक्रमातील प्रगती आणि आर्थिक संकटामुळे देशांतर्गत आंदोलने वाढली. इराणच्या अर्थव्यवस्थेवर अमेरिकन निर्बंधांचा परिणाम झाला, ज्याने महागाई आणि बेरोजगारी वाढवली. जानेवारी २०२६ मध्ये इराणमध्ये मोठी आंदोलने सुरू झाली, ज्यात विद्यार्थी आणि नागरिकांनी सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्या राजवटीविरोधात आवाज उठवला. या युद्धाचे थेट कारण २०२६ च्या फेब्रुवारीत झालेल्या अणुकार्यक्रमावरील चर्चा अपयशी ठरल्या. अमेरिका आणि इराण यांच्यात जिनेव्हा येथे चर्चा झाल्या, ज्यात अमेरिकेने इराणच्या अणुकार्यक्रमावर कठोर निर्बंध आणि मिसाइल उत्पादनावर मर्यादा घालण्याची मागणी केली. इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांनी अमेरिकन प्रस्ताव नाकारले, ज्याने चर्चा फिस्कटली. फेब्रुवारी २०२६ रोजी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर संयुक्त लष्करी हल्ले सुरू केले. हे हल्ले इराणच्या अणु सुविधा, लष्करी तळ आणि नेत्यांवर केंद्रित होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी हे हल्ले 'ऑपरेशन एपिक फ्युरी' म्हणून घोषित केले, ज्यात इराणच्या सर्वोच्च नेत्यांना आणि आयआरजीसी कमांडर्सना लक्ष्य करण्यात आले. इराणने प्रत्युत्तर म्हणून खाडी राष्ट्रांवर ड्रोन आणि मिसाइल हल्ले केले, ज्यात अमेरिकन दूतावास आणि तेल सुविधा लक्ष्य झाल्या. हे युद्ध 'इमिनेंट थ्रेट' च्या नावाखाली सुरू करण्यात आले नसले, तरी इस्रायलच्या योजनांमुळे अमेरिकेने साथ दिली. सद्यस्थिती (४ मार्च २०२६ पर्यंत) अतिशय गंभीर आहे. युद्धाचा चौथा दिवस सुरू असून, अमेरिका आणि इस्रायलने इराणवर 'ब्रॉड वेव्ह' हल्ले सुरू केले आहेत. तेहरानमध्ये मोठे स्फोट झाले असून, शेकडो नागरिक आणि लष्करी जवान मारले गेले आहेत. इराणच्या इस्लामिक रेव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) अमेरिका आणि इस्रायलला 'गेट्स ऑफ हेल' ची धमकी दिली आहे आणि 'क्रशिंग अटॅक' ची तयारी जाहीर केली.

संघर्ष लेबनॉनपर्यंत पसरला असून, हिझबुल्लाने इस्रायलच्या लष्करी तळांवर हल्ले केले, तर इस्रायली वायुसेनेने इराण आणि लेबनॉन दोन्हींवर बॉम्बिंग केली. अमेरिकेने इराणच्या नौदलाला 'डिसअ‍ॅसेम्बल' केले असून, २ अब्ज डॉलर्सच्या अमेरिकन जेट्स, रडार आणि उपग्रहांचे नुकसान झाले. ट्रम्प यांनी युद्ध 'चार आठवडे' चालेल असे म्हटले आहे, पण अमेरिकन सिनेटर्सना 'बूट्स ऑन द ग्राउंड' ची भीती वाटत आहे. इराणने हॉर्मुझ सामुद्रधुनी बंद केली असून, तेल पुरवठा व्यत्ययित झाला आहे. जागतिक बाजारात 'एलएनजी'ची कमतरता आणि तेल किंमतीत वाढ अपेक्षित आहे. या युद्धाचा जगावर होणारा परिणाम विनाशकारी आहे. आर्थिकदृष्ट्या, मध्यपूर्वेतील ४०% तेल पुरवठा इराण आणि खाडी राष्ट्रांवर अवलंबून आहे. हॉर्मुझ बंद झाल्याने तेल किंमती १५० डॉलर्स प्रति बॅरलपर्यंत जाऊ शकतात, ज्याने जागतिक महागाई वाढेल आणि अर्थव्यवस्था मंदावेल. अमेरिका आणि युरोपियन देशांना ऊर्जा संकटाचा सामना करावा लागेल, तर चीन आणि रशिया इराणला समर्थन देऊ शकतात, ज्याने जागतिक ध्रुवीकरण वाढेल. सुरक्षेच्या दृष्टीने, अणु युद्धाची भीती आहे, कारण अमेरिका आणि इस्रायल इराणच्या अणु सुविधा नष्ट करण्याच्या प्रयत्नात आहेत. ह े युद्ध इसिस सारख्या दहशतवादी गटांना पुन्हा सक्रिय करू शकते आणि शरणार्थी संकट निर्माण करेल. भारतावरही या युद्धाचा मोठा फटका बसत आहे. भारत ८५% तेल आयात मध्यपूर्वेतून करतो, ज्यात इराणचा वाटा लक्षणीय आहे. तेल किंमती वाढल्याने महागाई वाढेल, पेट्रोल-डिझेलच्या किंमतीत वाढ होईल आणि अर्थव्यवस्था प्रभावित होईल. खाडी राष्ट्रांतील ९० लाखांहून अधिक भारतीय प्रवासी आहेत, ज्यांची सुरक्षा धोक्यात आहे. मागील घटनेत मुंबईतील दीक्षित सोलंकीसारख्या भारतीय खलाशांचा मृत्यू झाला असून, सागरी मार्गांवर हल्ले वाढल्याने व्यापार व्यत्ययित होत आहे. भारताने तटस्थ भूमिका घेतली असली, तरी ऊर्जा सुरक्षेसाठी पर्यायी स्रोत शोधावे लागतील. हे युद्ध भारताच्या 'एक पृथ्वी, एक कुटुंब' या तत्त्वाला आव्हान देत आहे.शेवटी, हे युद्ध रोखण्यासाठी जागतिक नेत्यांनी हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने तातडीने चर्चा सुरू कराव्यात आणि अमेरिका-इराणमध्ये मध्यस्थी करावी. इराणच्या अणुकार्यक्रमावर निर्बंध घालतानाच राजकीय चर्चा आवश्यक आहे. अन्यथा, हे युद्ध जागतिक महायुद्धाचे रूप धारण करू शकते. शांतता हीच एकमेव पर्याय आहे, आणि त्यासाठी सर्व देशांनी एकत्र येणे गरजेचे आहे.

## प्रल्हादगिरी महाराज यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील हंडीनिमगाव- सुरेशनगर गावच्या मध्यावर असलेल्या जागृत स्वयंभू त्रिवेणीश्वर महादेव देवस्थान प्रांगणात असलेल्या अजानबाहू योगीराज भक्त प्रल्हादगिरी महाराज यांच्या समाधी मंदिरात नव्याने बसविण्यात आलेल्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते देवस्थानचे प्रमुख महंत रमेशानंदगिरी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.

अजानबाहू योगीराज भक्त प्रल्हादगिरी महाराज यांच्या प्राणप्रतिष्ठा निमित्ताने तीन दिवस प्राणप्रतिष्ठापणा आरंभादी कार्य, सकल मंडल देवता स्थापन,हवन,उत्तरोग हवन, क्षेत्रपाल बलिदान सिध्द योगवर हे विधी वेदमंत्राच्या जयघोषात करण्यात आले.

यावेळी गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते योगीराज भक्त प्रल्हादगिरी बाबांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. होम हवन अग्नी कुंडात त्यांच्या हस्ते श्रीफळ अर्पण करण्यात येऊन पुर्णाहूती देण्यात आली. यावेळी झालेल्या धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य भेंडा येथील वेदशास्त्रसंपन्न आचार्य गणेशदेवा कुलकर्णी व ब्रम्हवृंद मंडळींनी केले.

## प्रत्येक गावात निधी दिला : आ. खताळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** वधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावाला सव्वा वर्षांच्या कालावधीत विकासनिधी दिला असून निधी वाटप करताना कोणताही भेदभाव केला नसल्याचा दावा अमोल खताळ यांनी केला. गुंजाळवाडी, राजापूर, निमगाव, भोजापूर, चिकणी, सायखिंडी व मेंगाळवाडी येथील विविध विकासकामांच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते.



अन्याय झालेल्या भागांना प्राधान्याने निधी देण्याचा प्रयत्न केला असून भविष्यात महायुती सरकारच्या माध्यमातून भरीव निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते नामदेव गुंजाळ, विविध गावांचे सरपंच, उपसरपंच व स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. आमदार खताळ म्हणाले, निवडणुकीपूर्वी केवळ भूमिपूजनाचे फलक लावून जनतेची दिशाभूल करण्याचे प्रकार यापूर्वी झाले; मात्र महायुती सरकारने प्रत्यक्ष विकासकामे मार्गी लावली. निळवंडे डावा व उजवा कालव्यांमुळे पाणीपुरवठा सुरू असून प्रवरा व म्हाळुंगी नद्या वाहत्या झाल्या आहेत. गावातील बंधारे व तलाव भरण्यासाठीही शासन सहकार्य करत आहे. गुंजाळवाडीत दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा उल्लेख करून, कार्यकर्त्यांनी शांतता राखत ठाम भूमिका घ्यावी, असा इशाराही त्यांनी दिला.

## समता इंटरनॅशनल स्कूलचा 'अनोखी दुनिया' महोत्सव उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** समता इंटरनॅशनल स्कूल आणि समता टायनी टॉट्स यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा 'अनोखी दुनिया -व्हेअर इमॅजिनेशन बिकम्स रियालिटी' या संकल्पनेत अत्यंत दिमाखात पार पडला. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला साकार रूप देणारा हा सोहळा उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे संस्थापक ओमप्रकाश दादाप्पा कोयटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कुलस्वामिनी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन बाळासाहेब आढाव उपस्थित होते. डॉ. अमोल अजमेरे, कार्यकारी विश्वस्त सौ. स्वाती कोयटे, व्यवस्थापन समिती सदस्य संदीप कोयटे व पालकवर्ग मोठ्या संख्येने




उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना ध्येय, चिकाटी व परिश्रम यांच्या बळावर यश संपादन करण्याचा संदेश दिला. अध्यक्षीय मनोगतातून काका कोयटे यांनी मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर देत सर्वांगीण विकासासाठी शाळा कटिबद्ध असल्याचे सांगितले.

गणेश वंदना व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्राचार्य समीर अत्तार यांनी स्वागतपर भाषण केले, तर विभागप्रमुख राणी शेळके यांनी वार्षिक अहवाल सादर केला. यानंतर शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

'अनोखी दुनिया' संकल्पनेला साजेशा नृत्याविष्कारांनी रंगमंच उजळून निघाला. पारंपरिक व आधुनिक सादरीकरणांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांच्या ओघवत्या सूत्रसंचालनामुळे कार्यक्रमाला अधिक रंगत आली. शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे सोहळा यशस्वी ठरला.

## पीएफ फंडासाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नगरपंचायतसमोर आमरण उपोषण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नेवासा नगरपंचायत समोर आरोग्य व स्वच्छता विभागातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रॉव्हिडंट फंड (पीएफ) रकमेच्या मागणीसाठी आमरण उपोषण सुरू केले आहे. नेवासा खुर्द ग्रामपंचायत ते नगरपंचायत या काळात अनेक वर्षे सेवा बजावलेल्या कर्मचाऱ्यांनी निवृत्तीनंतरही फंड न मिळाल्याने हा निर्णय घेतल्याचे सांगितले.

कर्मचाऱ्यांनी यापूर्वी वारंवार नगरपंचायत अधिकाऱ्यांना भेटून अर्ज सादर केले; मात्र समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याचा आरोप त्यांनी केला. सध्या ६० ते ६५ वयोगटातील हे कर्मचारी असून, वयोमानामुळे काम करणे शक्य नसल्याने आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.

पगारातून नियमित कपात झालेला फंड शासन निर्णयानुसार मिळणे अपेक्षित असतानाही टाळाटाळ होत असल्याने उपोषणाचा मार्ग अवलंबल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. सामाजिक कार्यकर्ते शांताराम गायके व विकास चव्हाण यांनी उपोषणस्थळी भेट देऊन पाठिंबा दर्शविला.

## दिलबादशाह बाबा यात्रा उत्सव नियोजन बैठक उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**साकुर :** पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द येथे दिलबादशाह बाबा यात्रा उत्सवानिमित्त नियोजन बैठक उत्साहात पार पडली. सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या यात्रा समिती व ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने हनुमान मंदिर प्रांगणात सोमवारी (दि. ३ मार्च २०२६) ही बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीत सोमवार दि. २२ मार्च व मंगळवार दि. २३ मार्च २०२६ रोजी यात्रा उत्सव साजरा करण्याचे निश्चित करण्यात आले. उत्सवासाठी प्रति उंबरा ७०० रुपये वर्गणीस मंजुरी देण्यात आली. छबिना मिरवणुकीसाठी सनई-चौघड्याचे नियोजन करण्यात आले असून, गावाच्या संस्कृतीला साजेसा नामांकित लोकनाट्य तमाशा आयोजित करण्यास समितीने मान्यता दिली. मंदिर व परिसरात विद्युत रोषणाईची व्यवस्था करण्यात येणार आहे.

दुसऱ्या दिवशी जंगी हंगाम्याचे आयोजन व पैलवानांच्या सोयीसुविधांबाबतही सविस्तर चर्चा झाली. विशेष म्हणजे, यंदा अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीऐवजी प्रत्येक ग्रामस्थच अध्यक्ष या संकल्पनेतून उत्सव साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

बैठकीस यात्रा मंडळाचे सदस्य, ग्रामपंचायत पदाधिकारी, सोसायटीचे संचालक, तरुण मंडळ व ग्रामस्थ उपस्थित होते. उत्सव भक्तिभाव व सामाजिक बांधिलकी जपत पार पडेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## गोवंश कत्तलप्रकरणी कारवाई; ७.२० लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार :** ममदापूर शिवारात गोवंशाची कत्तल करणाऱ्या टोळीवर लोणी पोलीस स्टेशन यांनी धाड टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत सुमारे ७ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २ मार्च २०२६ रोजी रेहान महंमद अय्याज कुरेशी यांच्या घराशेजारील पत्राशेडमध्ये गोवंश कत्तल सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून १ लाख ६० हजार रुपये किमतीची जिवंत जनावरे, सुमारे ८०० किलो गोमांस तसेच ५ लाख ६० हजार रुपये किमतीची इनोव्हा कार (क्र. चक-०४-ग-८१२९) जप्त केली. कारमध्ये ३०० किलो गोमांस आढळून आले.

या प्रकरणी रेहान महंमद अय्याज कुरेशी, महंमद अय्याज कुरेशी व इतर दोघांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांची चाहूल लागताच तिघे फरार झाले असून त्यांचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## आमदार चषकात नारायणगावचा एम.एस.के. प्रथम, मेंगाळवाडीचा वीरभद्र द्वितीय

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील मेंगाळवाडी येथे वीरभद्र क्रिकेट क्लब यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आमदार चषक क्रिकेट स्पर्धेत नारायणगाव येथील एम.एस.के. क्रिकेट संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर मेंगाळवाडीच्या वीरभद्र क्रिकेट क्लबने द्वितीय क्रमांक मिळवला.

या स्पर्धेचे आयोजन वीरभद्र क्रिकेट क्लब, मेंगाळवाडी; वाघोबा इलेव्हन मेंगाळवाडी; आदिवासी इलेव्हन मेंगाळवाडी; जानूआई माता क्रिकेट क्लब, तमाकडवाडी; विरभद्र देवस्थान




ट्रस्ट, मेंगाळवाडी तसेच समस्त ग्रामस्थ सावरचोळ (मेंगाळवाडी) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या क्रिकेट स्पर्धेत एकूण ६४ संघांनी सहभाग घेतला होता.

विजेत्या संघांना आ. अमोल खताळ, सेवानिवृत्त प्राचार्य टी. एन. कानवडे, सावरचोळच्या सरपंच अनिता कानवडे, कामगार पोलीस पाटील संजय कानवडे, निमजच्या सरपंच अलका मेंगाळ, माजी जि.प. सदस्य भोरू भूतांबरे, भाजप उपाध्यक्ष अशोक कानवडे, भागवत कानवडे, भूषण शेटे, रामदास कानवडे, प्रशांत कानवडे, रामभाऊ राहणे, आशिष कानवडे, देविदास मेंगाळ, सतीश गोपाळे, नाजुका गांडाळ व अलका मेंगाळ आदी मान्यवरांच्या हस्ते आमदार चषक व रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी सागर कानवडे, पोपट मेंगाळ, पोपट गांडाळ, विजय मेंगाळ, विजय भूतांबरे, राम डोखे आणि अनिल भूतांबरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## श्रीरामपूर प्रिंटींग असोसिएशनच्या अध्यक्षपदी हराळे, उपाध्यक्षपदी बोरा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर प्रिंटींग असोसिएशनच्या अध्यक्षपदी नारायण हराळे, उपाध्यक्षपदी प्रमोद बोरा, खजिनदारपदी संतोष बाठीया, सेक्रेटरीपदी हरी वैष्णव यांची एकमताने निवड करण्यात आली. असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली. तसेच मुद्रण कलेचे जनक जोहान्स गुटेनबर्ग यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी रविंद्र पवार, शरद बेहळे, राजेंद्र जर्हाड, मयूर मानकर, रविंद्र कोठारी, राहुल कुलकर्णी, अभय पवार, संदिप बहिरट, दत्तात्रय गोसावी, तौसिफ शेख, बंटी थापर, उदय साबळे, संजय माखिजा, पंकज विळस्कर, गणेश परदेशी, दादासाहेब थोरात, संजय रामटेके, सुरेंद्र पानपाटील आदी उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित सदस्यांनी सांगितले की, आम्ही एकजुटीने काम करू. प्रिंटींग व्यवसाय हा अतिशय जुना आहे. यातमध्ये नवनवीन तंत्रज्ञान वापरून ग्राहकांना नवनवीन गोष्टी कशा देता येतील यासाठी विशेष प्रयत्न करू.






रमजानुल मुबारक २०२६
रोजा नंबर १५

## परलौकिक जीवन जिंदगी लंबी नहीं : बडी होंनीं चाहिये ...!!

(१) दिव्य कुरआन म्हणतो , !! ''ईस मिट्टी से हमने तुम्हें पैदा किया , और , ईसी मिट्टी में हम तुम्हे लौटाऐंगें , और , ईसी मिट्टी से तुम्हें दुबारा उठायंगे !'.

अर्थात:-'' आम्ही तुम्हाला याच मातीतुन जन्म दिला , आणि , याच मातीत तुम्हाला दफन (मृत्यू) करून मिसळू , आणि , पुन्हा याच मातीतून दुसऱ्यांदा पुनर्जन्म देवू ( प्रलयकाळ - कायमत चा दिवस ).'' (२). मनुष्य हा विचार करतो की, काय? मी मरण पावल्यानंतर , मला पुन्हा जिवंत करून उठवलं जाईल?? ( सुरहा नं. १९ अल -मरियम आ नं. ६६ ). पुन्हा, दिव्य कुरआन म्हणते, '' मनुष्याला हीं साधी गोष्ट हीं आठवत नाहीं, की, आम्ही त्याला या आधी हीं जन्माला घातलं आहेत, जेव्हा तो कधीच नव्हता?? सु. नं १९ अल -मारियम आ नं. ६७) (३),दिव्य कुरआन म्हणतो,'' तोच तर आहे,जो तुमच्या मातेच्या गर्भाशयात तुमचे हवे तसे रुप घडवितो,त्या जबरदस्त बुध्दिमाननाशिवाय इतर कोणी ही अल्लाह (ईश्वर) नाही.'' (सुराह अल -ईमरान ). जगात प्रत्येकाला अल्लाह (ईश्वरा) ने काही तरी चांगल्या कामासाठीच जन्म दिला आहे, प्रत्येक मनुष्य - प्राणी -पक्षी -कीटक - जीव जंतू हा चांगल्या कामासाठीच जन्म झाला आहे. प्रत्येक जीव हा फार महत्वाचा घटक ( व्ही. आय. पी. प्रतेक जन ) अवश्यक आहे. कोणीही बेकार जन्माला आला नाहीत, प्रत्येकाचं काम जबाबदारीच संपूर्णपणे वेग-वेगळ्या प्रकारचे आहेत. प्रत्येक जीव एकमेकांसाठी खास आहेत , वेगळा असूच शकत नाहीत. प्रत्येकांना एकमेकांची गरज असते. परंतु हें मनुष्य समजत नाही. तो स्वतःच्याच मस्तित वावरत असतो. मी -मीच - माझं -माझ्याच माझ्या करीताच विचार करत असतो, रुपावर -तारुण्यांवर - जवानीवर - दौलतीवर - स्वतःच्या पैशाच्या जोरावर घमेंड करतो. त्याच घमेंडी वर इतर लोकांना त्रास देत असतो . शेखी मिरवत इतरत फुशारक्या मारत असतो. या सर्व गोष्टींमुळे तो वेगवेगळ्या वाईट सवयी स्वतःला लावून घेत असतो . स्टेटस सिम्बॉल म्हणून दुसऱ्यांना हिनवत दुसऱ्यांना तुच्छतेने पाहात असतो. त्या घुंधित वारंवार चुकाच करीत असतो, त्याला हे समजत नसते की हे सर्व एका दिवशी संपणार आहेत . हे सर्व मान्य अंतिम सत्य आहे हे कोणीही टाळू व नाकारु शकत नाही. हा जन्म -मृत्यूचा फेरा आहेत, कुणालाही चुकणारा नाहीत. सत्य व असत्य, सन्मार्ग व वाममार्ग, न्याय, अन्याय, पाप व पुण्य, सदाचार व दुराचार, ईश्वराचे आज्ञापालन व अवज्ञा हें सम समान असूच शकत नाहीं, हें वेगवेगळे आहेत, सत्कार्माचा चांगला आणि दुशकर्मा चा वाईट परिणाम हा असलाच पाहिजे. आपण कधी कधी असें हीं पाहतो की, सत्कार्मा करणाऱ्याला पुरस्कार व दुष्कार्म करणाऱ्याला शिक्षा मिळेलच असं कधी पाहवयास भेटत नाहीं, कधी आपण असें हीं बघतोय की, सन्मार्गी सदाचारी लोकं संकट आणि त्रास हाल अपेष्टा सहन करून जीवन जगतात तर आईश करणारे, वाममार्ग, चैन, चोरी चपाटे करणारे मज्जा करतात, ऐश आरामात थाठात राहतात. मनुष्याचा अंतरात्मा निषपेक्ष न्यायाची अपेक्षा करतो. दुष्ट आत्याचारी, दुष्ट प्रवृत्ती, दुराचारी, भ्रस्टाचारी, लोकांना मानवतेवर अन्याय केला म्हणून कठोर शिक्षा व्हावी. जें लोकं सदाचारी राहिलेत कोणत्याही प्रलोभांनां कधीच बळी नं पडता कायम आहेत त्या परिस्थिती मध्ये हीं मानवतेची निस्वार्थी पणे सेवाच केली, लोकांचे दुःख दूर करण्यासाठी आपलं संपूर्ण जीवन घालवले अशा सदाचारी लोकांना त्यांच्या सत्कार्माचा चांगला मोबदला मिळावा. ह प्रत्येक सदाचारी व्यक्तीची अपेक्षा असतं. परंतु जगात असं घडताना दिसत नाहीं. असं बघून विचार येतो की, येवढ करून आपल्याला काय फळं भेटलीस, हीं अंधेर नगरीं आहेत, हीं सृष्टी अन्यायीनां बळ देते वगैरे. आणि हें सर्व आपला सृष्टीचा निर्मिक निर्माता ईश्वर परमेश्वर त्यांना मोकळीक देतोय आणि उघड्या डोळयांनी सर्व पाहतोय. परंतु हें सर्व खोटं ाहेत. विश्वाचा निर्माता त्यांना सूट मोकळीक देऊन त्यांच्या कर्माची परीक्षा घेत असतोस . व्यक्तीच्या विवेक बुद्धीची हीं परीक्षा आहे की संपूर्ण स्वातंत्र्य व अपार क्षमता मिळाल्यावर तो कोणता कसा मार्ग निवडतो हें निर्माण कर्त्याला पाहायचं असतं. तो त्याचा कसा वापर करतो. तो सत्कार्म क दुष्कर्म करतोय हें तो पाहतोय. आणि त्याच साठी त्याला ढील - सूट दिलेली असते. जग हें प्रत्येक मानवाचं परीक्षा स्थळ असल्यानें येथे पुर्ण न्याय होऊ शकत नाहीत, संपूर्ण न्याय परीक्षा काळ संपल्यावर च होणार, याचाच अर्थ मृत्यू नंतर मानवास पुन्हा जीवतं करण्यात येईल व त्याच्या संपूर्ण प्रत्येक कर्मा चा हिशोब घेतलाच जाईल. परलौकिक जीवणा च्या धारणे शिवाय संपूर्ण न्यायनिवडया शिवाय हें विश्व चा न्याय हें अपूर्ण. दिव्य कुरआन म्हणते, '' निच्छितच आम्ही मेलेल्याना जिवंत करू आणि आम्ही त्यांच्या कर्माचा हिशोब, ( रेकॉर्ड ) तयार करीत असतो , जी कर्मे ते पुढे पाठवतात आणि जी आपल्या मागे सोडतात. एका स्पष्ट ग्रंथात प्रत्येक गोष्टीची आम्ही नोंद केलेली आहे. ( सुरहा नं. ३६, यासीन आ नं. १२).परमेश्वर अल्लाह नें न्यायनिवडया साठी एक वेळ निच्छित केलेली आहेत, ईश्वराने मनावासाठी या जगात जी कालमर्यादा ठरवलेली आहेत ती समाप्त जगाचा शेवट होणार आहे. सूर्य, चंद्र, तारे, नक्षत्रे हें सर्व निखळून पडतील, आकाश गुंडाळलं जाईल, सागरांना आग लागेल, पिंजलेल्या कापसा प्रमाणे पर्वत हवेत तारगले जातील, पृथ्वी आपल्या पोटातील सर्व रहश्य ओकून टाकेल, प्रचंड मोठा आवाज होऊन पृथ्वी सपाट मैदान होईल. तोच दिवस'' कायमत'' चा अर्थातच महाप्रलंयाचा असेल. तोच दिवस मोबदल्याचा असेल. तो कधी येणार हें फक्त परमेश्वर - अल्लाहलाच ठाऊक माहित. परंतु तो दिवस येणारच हें निश्चित.महाप्रलंय ( कायमत ) च्या न्यायनिवडया च्या दिवस अल्लाह ( ईश्वर ) न्यायालय प्रस्थापित करून सृष्टीच्या जन्मापासूनच्या अंता पर्यतच्या जें जें मनावानी जन्म घेतलं त्या सर्वाना आपल्या मुळरूपात पुनर्जन्म देऊन - जीवित करून आपल्या न्यायालयात हजर करून सृष्टीच्या प्रत्येक मानवाचा जीवसृष्टीचा जीव जंतू ला उभा करून प्रत्येकाला त्यांनी केलेल्या चांगल्या वाईट कर्माचा हिशोब विचारेल, त्यानंतर तुमचे परलौकिक जीवन कसे असेल हें ठरवलं जाईल. ते परलौकिक जीवन अनंत काळ असेल.. ते कधीच नं संपणारे असेल. जगात केलेले कोणतेही कर्म सदाचार असो, की, दुराचार वाया जात नाहीं. प्रत्येक कर्म आपल्या सोबत मोबदला घेऊन येतो. सृष्टीचा निर्माता प्रत्येक कर्माची नोंद करीत असतो व आहे. आपल्या प्रत्येक कर्माची साक्ष आपलं इंद्रिय देतील, तेथे कनभर हीं अन्याय होणार नाहीं. तेथे फक्त एकट्याला उभं राहावं लागेल. तेथे प्रत्येकाला प्रत्येकाच्या स्वतःच्या कर्माचे पडेल कोणीच कोणाची मदत करणार नाहीत. स्वतःचे आई वडील सुद्धा काहीच मदत करू शकणार नाहीं. ज्याच्या सत्कार्माचे पारडे जड राहील त्यांना बक्षीस दिलं जाईल तो पुरस्कार म्हणजे अनंत काळ चिरंतर राहण्याची सोय ''जन्नत'' ( स्वर्ग ).त्यामध्ये चिरंतर सुख अनंत काळा पर्यंत राहील. ज्याच्या पारड्यात दुष्कर्म असेल त्यांना मग त्यांचे बक्षीस म्हणजे नरक ( दोजख ) सृष्टी मध्ये केलेल्या दुष्कार्म -दुराचार -भ्रस्टाचार,- वाईट कामं इत्यादी. त्यामध्ये अनंत काळात भडकत्या अग्नी मध्ये कायम जळत राहणं. मग त्यावेळी जागं होऊन काहीच फायदा होणार नाहीं.त्या दिवशी पास्तव्या शिवाय काहीच उरणार नहीं. दिव्य कुरआन म्हणतो की,'' तुमची सुंदरता - जवानीचा घमंड -पैशाची घमंड -तुमचं कर्तृत्व - तुमचं कौशल्य (हुनर) सर्व एका दिवशी संपणार आहेत रे, मग तो गर्विष्ठपणा (मी पणा) काय कामाचा ?, काय तुम्ही ऐकले नाहीत की ,प्रत्येक जीवाला एका दिवशी मृत्यू अटळ आहे म्हणून ( सुराह नं.२९ व आ.न.५७ ). तर जीवनात कायम चांगले काम करत राहणे, चांगल्या गोष्टी शिकणे, परोपकार करणं,आई-वडीलांचा आदर सन्मान करणे,त्यांचा सांभाळ व्यवस्थित करणं,आपल्या मुलांचं संगोपन व्यवस्थित करणं, खासकरून मुलीच्या संगोपन जेवढं चांगले संस्कार देता येईल तेवढे प्रयत्न करीत राहिले पाहिजे.व्यवहार चांगले करणं, विश्वासास पात्र राहणं, कोणाचाही विश्वासघात करु नयेत. जमीनीवर कलह निर्माण करू नयेत .शांततेने रहावे व एकदुसऱ्या बरोबर सदव्यवहार करावं. दुराचार माजू नयेत, अतिरेक तर कधीच करु नयेत . दिव्य कुर आन म्हणते, '' एक दिवस तुम्हाला आमच्याकडे कायम वास्तव्यासाठी येणंच आहे,तर मग येवढं घमंड (गुरुर) काय कामाचं?''. ''आम्ही तुम्हाला याच मातीत मिसळणार आहेत '', आणि '' याच मातीतून पुन्हा जन्म देऊन उठवणार आहोत.'' मृत्यू हे कोणत्याही जीवजंतू व मानवी जीवनातील अंतिम सत्य आहे , पवित्र कुरआन म्हणतो ,'' हर जाणदार चिज को मौत का मजा चखना है ...'' म्हणजेच प्रत्येक वस्तू ही नाशवंत आहे, कधी ना कधी तरी मातीत मिसळणार आहेत. तर मग मनुष्य फार वर्ष जगण्यापेक्षा कसा जगला याला किंमत आहे. म्हणतात ना , जिंदगी लंबी नहीं बडी होनी चाहिए.

(क्रमशः)



**डॉ. सलीम शेख**
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# डॉ. सुजय विखे यांचा जनता दरबार

## नागरिकांच्या अर्जांचा स्वीकार







**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : भारतीय जनता पक्षाचे नवनियुक्त प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे यांनी अहिल्यानगर शहरात जनता दरबार घेऊन नागरिकांच्या विविध समस्या व मागण्यांबाबतचे अर्ज स्वीकारले. सकाळी १०.३० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत ते नागरिकांच्या भेटीसाठी उपलब्ध राहिले असून जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी आपल्या अडचणी, सूचना आणि निवेदने त्यांच्या समोर मांडली. विळद घाट येथील इंजिनिअरिंग कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित या जनता दरबाराला जिल्ह्यातील विविध भागांतून नागरिक व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

अनेक नागरिकांनी आपल्या प्रश्नांबाबत लेखी अर्ज सादर केले. डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रत्येक अर्ज काळजीपूर्वक ऐकून घेत संबंधित विषयांबाबत योग्य त्या स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न त्यांनी यावेळी केला. प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर प्रथमच नगरमध्ये आगमन झाल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण होते. मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या कार्यकर्त्यांनी पुष्पगुच्छ देत त्यांचे स्वागत केले तसेच घोषणाबाजी करत शुभेच्छांचा वर्षाव केला. यावेळी माध्यमांशी बोलताना डॉ. सुजय विखे यांनी राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीबाबत संकेत दिले. १० ते १२ मार्च दरम्यान राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. बंगाल, तमिळनाडू, केरळ, ओडिशा आणि आसाम या राज्यांतील निवडणुकांसोबत महाराष्ट्रातील बारामती व राहुरी या दोन मतदारसंघांच्या पोटनिवडणुकाही जाहीर होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी नमूद केले.

स्व. कर्डिले यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या राहुरी विधानसभा मतदारसंघाबाबत बोलताना त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावना व्यक्त केल्या. कर्डिले साहेबांचे चिरंजीव अक्षय कर्डिले यांना उमेदवारी मिळावी, अशी कार्यकर्त्यांची भावना असून अंतिम निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षश्रेष्ठी घेतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

## गोदावरी बायोरिफायनरीज येथे राष्ट्रीय सुरक्षा दिवस उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव** : 'सुरक्षा प्रथम' या ब्रीदवाक्यानुसार गोदावरी बायोरिफायनरीज लि. साकरवाडी येथे राष्ट्रीय सुरक्षा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त कारखान्यामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी सुरक्षिततेचा जागर केला.कार्यक्रमाची सुरुवात कारखान्याचे डायरेक्टर सुहास गोडगे यांच्या हस्ते सुरक्षा ध्वज फडकावून करण्यात आली. मुख्य तांत्रिकी अधिकारी प्रविण विभुते यांनी कारखान्यात काम करत असताना घ्यावयाची काळजी आणि सुरक्षिततेचे तांत्रिक महत्त्व सर्वांना पटवून दिले. अपघातामुक्त कार्यसंस्कृती जोपासण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी जनसंपर्क अधिकारी गणेश पाटील यांनी उपस्थित सर्व अधिकारी आणि कामगारांना सुरक्षितता व स्वच्छतेची सामूहिक शपथ दिली. राष्ट्रीय सुरक्षा दिवसानिमित्त कारखान्यात संपूर्ण आठवडा 'सुरक्षा सप्ताह' म्हणून साजरा केला जात आहे. या सप्ताहामध्ये कामगारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि सुरक्षेबद्दल जनजागृती करण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाला डायरेक्टर सुहास गोडगे, मुख्य तांत्रिकी अधिकारी प्रविण विभुते, जनरल मॅनेजर डॉ. गणेश गंडी, सुरक्षा अधिकारी श्रीधर धमाळ, संदिप रक्ताट यांच्यासह कारखान्यातील सर्व विभागांचे अधिकारी आणि कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वीकृत नगरसेवक सोनल अजमेरे यांचे प्रतिज्ञापत्र खोटे, जिल्हाधिकाऱ्यांकडे सुनावणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव नगरपरिषदेचे कोल्हे गटाच्या विद्यमान स्वीकृत नगरसेविका सोनल अजमेरे यांनी स्वीकृत नगरसेवक निवडीत खोटे प्रतिज्ञापत्राच्या मदतीने पद मिळवले असून त्यांचे पद रद्द करण्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते प्रकाश दुशिंग यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्जाच्या माध्यमातून केला होता. या बाबत शुक्रवार दि. ०६ रोजी दुपारी ४ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांच्या दालनात सुनावणी करण्यात येणार आहे.

कोपरगाव नगरपरिषदेच्या स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीत स्वीकृत नगरसेवक हे पद २०१० च्या निकषानुसार पात्र ठरण्यासाठी उमेदवार हा अहर्तामध्ये सेक्शन ४ मध्ये दिलेल्या नियमानुसार नुसार पात्र असावा लागतो. यानुसार कोल्हे गटाच्या सोनल अजमेरे यांनी सेक्शन ४ प्रमाणे नामनिर्देशन अहर्ता छ प्रमाणे धारण करून त्यांनी उमेदवारीचा अर्ज दाखल केला आहे. मात्र यामध्ये सोनल अजमेरे यांनी दाखवलेली संजीवनी सांस्कृतिक मंडळ, सहजानंदनगर, शिंगणापूर ही संस्था कोपरगाव नगरपरिषद कार्यक्षेत्रात येत नाही. तसेच संजीवनी सांस्कृतिक मंडळ संस्थेच्या घटनेनुसार कार्यकारी मंडळावर नियुक्तीसाठी संबंधित व्यक्ती किमान एक वर्ष संस्थेची सभासद असणे आणि संजीवनी सहकारी साखर कारखान्याचा कायम सेवक असणे आवश्यक आहे.

त्यामुळे या अटींमध्ये नगरसेविका सोनल अजमेरे बसत नसून त्यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात खोटी माहिती दिली आहे. स्वीकृत नगरसेवक पद २०१० च्या निकषानुसार पात्र उमेदवारासाठी राखीव असताना सोनल अजमेरे यांनी चुकीची माहिती देवून त्यांनी फसवणूक केली आहे. सोनल अजमेरे यांची स्वीकृत नगरसेवक पदी झालेली निवड हि पूर्णतः बेकायदेशीर असल्याचा दावा प्रकाश दुशिंग यांनी केला आहे.

या प्रकरणावर जिल्हाधिकारी व अहिल्यानगर सह आयुक्त (न.प.प्र.) सुनावणी घेणार असून अर्जदार प्रकाश दुशिंग आणि पदनिर्देशीत अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी आणि सोनल अजमेरे यांना संबंधित कागदपत्र, ओळखपत्रासह समक्ष नचुकता उपस्थित राहण्याची सूचना नोटीसच्या माध्यमातून देण्यात आली आहे.

## शनेश्वर देवस्थान कामगारांच्या उपोषणास शेतकरी संघटनेचा पाठिंबा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**सोनई** : श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथे शनेश्वर देवस्थान कर्मचाऱ्याचे विविध प्रश्नावर साखळी उपोषण सुरू आहे,या उपोषण स्थळी औरंगाबाद खंडपीठाचे विविध तज्ञ ड. अजित काळे यांच्या उपस्थितीत नेवासा तालुका शेतकरी संघटनेच्या वतीने उपोषणाला पाठिंब्याचे पत्र देण्यात आले.

कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न समजून घेऊन प्रश्न संदर्भात ड. काळे यांनी देवस्थानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल चोरमले यांच्याशी साधक-बाधक चर्चा होऊन या प्रश्नावर मार्ग काढून कर्मचाऱ्यांना मागील वर्षाचा २०२५ बोनस चालू पगाराप्रमाणे दीडपट देण्यात यावा या व कर्मचाऱ्यांच्या अनेक प्रश्न संदर्भात चोरमले व शनेश्वर संस्था कर्मचारी युनियन यांच्यात चर्चा घडवून आणण्यात ड अजित काळे यांना यश आले. काळे यांनी चोरमले यांना लवकरात लवकर कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी तोडगा काढण्याचे सांगितले.

यावेळी नेवासा तालुका शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष मेजर अशोक काळे, तालुका उपाध्यक्ष बाबासाहेब नागवडे, कायदेशीर सल्लागार बाळासाहेब कावळे, तालुका सचिव किरण लंघे, जिल्हा उपाध्यक्ष हरीअप्पा तुवर, युवक आघाडी अध्यक्ष डॉ. रोहित कुलकर्णी, बेलपिंपळगाव जिल्हा परिषद गटाचे उमेदवार बंडोपंत चौगुले, ज्येष्ठ मार्गदर्शक दत्तू निकम, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर नेहमी अग्रेसर असणारे त्रिंबक भदगले ज्ञानेश्वर बानकर कार्लेस साठे सर नेवासा तालुका प्रसिद्ध प्रमुख दादासाहेब नाबदे तसेच शनेश्वर संस्थांचे कर्मचारी उपस्थित होते.

शेतकरी नेते रवी मोरे यांनी उपोषण कर्त्यांची समक्ष भेट देऊन शासन स्तरावर लक्ष घालण्याची मागणी केली आहे.

## वंचितचे आंदोलन मिटले, नरम गरम चर्चांना वेग


**अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : राहता तालुक्यातील निमगाव हद्दीत १२चारी वरील विस्थापितांना हक्काच्या जागा द्याव्यात यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आरणे यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर नुकतेच आंदोलन केले. आंदोलन यशस्वी झाले सरपंच कैलास कातोरे ग्रामविकास अधिकारी सोनवणे माजी उपसरपंच अजय जगताप यांच्या पुढाकाराने मध्यस्थीने तोडगा काढत आंदोलन स्थगित करण्यात आले. दिवसभर ग्रामपंचायत कार्यालयासमोर विस्थापितांची गर्दी असल्याने ग्रामस्थांनी ही ग्रामपंचायत आवारात येत नेमकी काय होते याची विचारपूस केली त्यात ग्रामपंचायत सदस्यांचा ही सहभाग होता. ग्रामपंचायत कार्यालय समोर आंदोलन असल्याने शासनाचे प्रतिनिधी म्हणून ग्रामविकास अधिकारी सोनवणे यांना आंदोलकांना सामोरे जावे लागले. आंदोलनावर तोडगा निघाला, परंतु काही सदस्यांनी ग्रामसेवकांना भेटून आमच्या प्रभागात नागरिकांची कामे होत नसल्याचा ठपका सोनवणे सह सरपंचावर ठेवला. यामुळे काल दिवसभर वातावरण तापलेले दिसत होते. काहींनी थेट माध्यमांच्या प्रतिनिधी जवळ फोन करून विकास कामात आम्हाला सरपंच व ग्रामविकास अधिकारी विश्वासात घेत नाही, अशाही तक्रारी केल्या. तसेच सायंकाळ झाल्यानंतर रात्री या विषयावर पुन्हा जोरदार वाद प्रतिवाद होत आमच्यावर दबाव टाकत असले बाबत प्रतिक्रिया दिल्या. दिवसभर व रात्रभर चाललेल्या या चर्चा दबक्या आवाजात सुरू होत्या वंचितचे आंदोलन मिटले परंतु खदखद मात्र या निमित्ताने पहावयास मिळाली. सर्वसामान्यांना न्याय देणार -सरपंच कैलास कातोरे निमगाव गावामध्ये ना. राधाकृष्ण विखे व डॉ . सुजय दादा विखे यांच्या अधिपत्याखाली अनेक विकास कामे मागील पंचवार्षिक काळात झाली. आणि याही वर्षी ते होत आहेत असे त्यांनी नमूद केले.

# कऱ्हेघाट परिसरात गुटख्याची स्कॉर्पिओ जप्त

## 'गुटखा किंग' युसूफ चौगुलेसह तिघांवर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : संगमनेर तालुका पोलिसांच्या रात्रीच्या गस्त पथकाने नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील क-हेघाट परिसरात गुटखा आणि सुगंधी तंबाखूची वाहतूक करणारी महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ पकडत मोठी कारवाई केली. या कारवाईत सुमारे १९ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, 'गुटखा किंग' म्हणून ओळख असलेल्या युसूफ चौगुलेसह तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संगमनेर तालुका पोलीस ठाण्यातील पोलीस कॉन्स्टेबल अमित महाजन यांनी दिलेल्या फिर्यादीवरून घारगाव पोलिसांनी युसूफ चौगुले, स्कॉर्पिओ चालक शाम कोंडीभाऊ काळे (रा. रणखांब फाटा, संगमनेर) तसेच सिल्वासा येथील शक्ती ट्रेडर्सचे मालक धिरज माळी यांच्याविरोधात गुटखा बंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. चालक शाम काळे याला अटक करण्यात आली असून युसूफ चौगुले फरार झाला आहे.

**संशयावरून वाहन थांबवून तपासणी**

रात्री गस्त घालत असताना क-हेघाट परिसरात पांढऱ्या रंगाची महिंद्रा स्कॉर्पिओ (क्रमांक एमएच ४६ एक्स ४०४६) संशयास्पदरीत्या फिरताना आढळली. पोलिसांनी वाहन थांबवून तपासणी केली असता, त्यामध्ये अवैधरित्या विक्रीसाठी साठवून ठेवलेला ६ लाख ५३ हजार ४०० रुपये किमतीचा विमल पान मसाला व ६६ हजार ६०० रुपये किमतीची सुगंधी तंबाखू असा एकूण ७ लाख २० हजार रुपयांचा प्रतिबंधित माल आढळून आला. याशिवाय गुन्ह्यात वापरलेली सुमारे १२ लाख रुपये किमतीची स्कॉर्पिओ गाडीही जप्त करण्यात आली आहे. प्राथमिक तपासात हा माल युसूफ चौगुले यांच्या सांगण्यावरून सिल्वासा येथून आणण्यात येत असल्याचे समोर आले आहे.

**सराईत तस्करावर पुन्हा कारवाई**

यापूर्वीही संगमनेर-साकुर रोडवरील रणखांब फाटा येथे इनोव्हा कारमधून गुटखा वाहतूक करताना युसूफ चौगुले याचे नाव पुढे आले होते. आता पुन्हा त्याचे नाव समोर आल्याने तो सराईत गुटखा तस्कर असल्याची चर्चा आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश शिंदे करीत आहेत. फरार आरोपीचा शोध सुरू असून, पोलिसांची पुढील कारवाई काय असणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## द•ख•ल

### चांगदेवनगर येथील महादेव मंदिरांच्या जिर्णोध्दाराचे काम सुरू



**पुणतांबा** : परिसरातील चांगदेवनगर येथे येथील ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन महादेव मंदिरांच्या जिर्णोद्धाराचे काम सुरू केले आहे. येथील मारूती मंदिरांच्या पूर्व बाजूला अंदाजे ५५ वर्षापूर्वी बांधलेले महादेव मंदिर आहे. अंदाजे १५ लाख रुपये खर्च करून मंदिराच्या जिर्णोध्दार करण्यासाठी येथील भाविक तसेच ग्रामस्थांनी पुढाकार घेतला आहे. जिर्णोद्धाच्या कामासाठी परिसरातील भाविकांनी सढळ हाताने आर्थिक मदत करावी, असे आवाहन येथील ग्रामस्थांनी केले आहे.

### शनिशिंगणापुरात रक्तदान शिबिर

**सोनई** : श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथे श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आयोजित शुक्रवार दिनांक ६ मार्च रोजी ज्यांनी ज्यांनी धर्मसाठी बलिदान दिले. त्यांच्या स्मरणार्थ धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज चौक शनिशिंगणापूर येथे धर्मवीर बलिदान मास व तिथीप्रमाणे शिवजयंती उत्सव निमित्ताने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केल्याची माहिती श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानच्या वतीने देण्यात आली. ७ वर्षांपासून रक्तदान शिबीर होत असून त्यास प्रचंड प्रतिसाद असतो, तेव्हा रक्तदान शिबिर सकाळी नऊ पासून ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत आयोजित केले असल्याने सर्व रक्तदान दातांनी रक्तदान करण्याचे सुचित केले आहे.

### सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी, बनसोडे यांचा सन्मान



**शिर्डी** : राहाता तालुक्यातील साकूरी येथील माजी उपसरपंच व सामाजिक कार्यकर्ते सचिन बनसोडे यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सचिन बनसोडे यांनी साकूरी ग्रामपंचायतचे पाच वर्षे उपसरपंचपद भूषवले आहे. त्यांचे काळात अनेक विकासकामे झाल्याने साकूरी गावचा कायापालट करण्यात ते यशस्वी झाले आहेत. रिपब्लीकन पक्षाचे उत्तर महाराष्ट्र सचिव दिपक गायकवाड, संघटक प्रमुख कैलास शेजवळ,भैया इनामदार, रविंद्र दारोळे, मुन्ना सय्यद, मनोज दुशिंग, बाबासाहेब पगारे, मंगेश थोरात, पठारे , गायकवाड यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देत यांचा सत्कार केला.

### पुणतांबा येथे हमीभाव खरेदी केंद्र सुरु

**पुणतांबा** : शासकीय हमीभाव (पीएसएस) २०२५-२६ अंर्तगत पुणतांबा येथील पुण्यस्तंभ फार्मर्स अँग्रो प्रोड्यूसर कंपनीमार्फत हमी भाव खरेदी केंद्र सुरु झाले आहे अशी माहिती प्रशांत अप्पासाहेब धनवटे व योगेश नळे यांनी दिली आहे हरभरा पिकासाठी ५८७५ रुपये भाव आहे. शेतकरी वर्गाने यासाठी पिक नोंद असलेला ७ /१२ उतारा, आधार कार्ड , बँक पासबुक व मोबाईल नंबर सहआवश्यक कागदपत्रे सादर करून कंपनीत येऊन नोंदणी करणे आवश्यक आहे. पुणतांबा जंक्शन रेल्वे स्टेशनच्या पूर्व बाजूला असलेल्या पुण्यस्तंभ अँग्रो प्रोडयू सर कंपनीशी शेतकरी वर्गाने तातडीने संपर्क साधावा असेही धनवटे व नळे यांनी स्पष्ट केले आहे.

### प्रलंबित समस्या तातडीने मार्गी लावा : आ. लंघे

**नेवासा** : नागरिकांच्या महसूल विषयक प्रलंबित समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने कार्य करण्याचे निर्देश नेवासा तालुक्याचे आ. विठ्ठल लंघे यांनी नेवासा पंचायत समितीमध्ये झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान प्रसंगी बोलतांना दिले. नेवासा पंचायत समिती सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र. १ ची अंमलबजावणी बैठक आ. विठ्ठल लंघे यांच्या अध्यक्षतेखाली व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती. महसूल मंडळस्तरावर राबविण्यात येणाऱ्या या शिबिरांचे प्रभावी नियोजन व यशस्वी आयोजन करण्यासाठी विविध विषयांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

झालेल्या बैठकीच्या प्रसंगी तहसीलदार डॉ.संजय बिरादार,गटविकास अधिकारी संजय लखवाल, सहायक गटविकास अधिकारी बाळासाहेब कासार, पोलीस निरीक्षक महेश पाटील तसेच सर्व विभाग प्रमुख, नगरसेवक, सरपंच/प्रशासक व लोकप्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते. सर्वसामान्य नागरिकांना शासकीय सेवा सुलभ व जलद गतीने उपलब्ध करून देणे हेच या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट असल्याने प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून हे अभियान यशस्वी करण्याचा प्रयत्न केला जाईल अशी ग्वाही तहसीलदार संजय बिरादार यांच्यासह उपस्थित अधिकाऱ्यांनी यावेळी बोलतांना व्यक्त दिली.

## साई मंदिराच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक बनले पुढारी, गणवेशाचा विसर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**शिर्डी** : जग प्रसिद्ध असलेल्या श्री साई समाधी मंदिराच्या एक नंबरच्या प्रवेश द्वारावर कर्तव्य बजावणाऱ्या साई संस्थानच्या सुरक्षा रक्षकांना आपल्या कर्तव्याचा विसर पडला असून रक्षक गणवेशा ऐवजी कडक पांढरे शुभ्र कपडे घालून ड्युटी करत असल्याचे दिसून येत आहे.

साई बाबा संस्थानने प्रत्येक कर्मचाऱ्याला युनिक युनिफॉर्म व ओळखपत्र दिले असून त्यामुळे त्या कर्मचाऱ्यांची ओळख पटत असते. प्रत्येक कर्मचाऱ्याने आपला गणवेश परिधान करून मगच ड्युटी वर हजर रहावे असा नियम घालून दिलेला आहे. त्याचे अंगावर त्याच्या डयुटीचा गणवेश नसल्यास त्याला ड्युटी करत येत नाही तसेच कारवाई ही होऊ शकते हा संस्थानचा नियम आहे . कर्मचाऱ्यांच्या गणवेशासाठी संस्थान वर्षाकाठी लाखो रुपये खर्च करत असते.

परंतू काही कर्मचारी या नियमाला कोलदांडा घालून सर्व नियम धाब्यावर बसवून अधिकाऱ्यांच्या नाकावर टिच्चून पुढारी ड्रेस मधे डयुटी करताना चे चित्र पाहावयास मिळत आहे. त्या गेटने अध्यक्षा तथा प्रधान न्यायाधीश, कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, संरक्षण अधिकारी असे अनेक वरिष्ठ अधिकारी या गेटने दररोज ये जा करतात मग यांच्या लक्षात हा प्रकार येत नाही का? सदर नियम मोडून हे कर्मचारी नेमके कुणाच्या अर्शिवादाने अशी खुले आम ड्युटी करत आहे हा सर्व सामान्यांना प्रश्न पडला आहे.

दरम्यान नियमांवर बोट ठेवणारे पोलीस संरक्षण रोहीदास माळी या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे धाडस दाखवतील काय? याची उत्सुकता आहे.

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी मिरजगाव ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात श्री. / श्रीम/कु. मुन्ना अब्दुल बागवान रा. मिरजगाव ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर यांनी त्यांच्या नामे स्वतः यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

सदरील व्यक्तीचा जन्म मिरजगाव ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी दि. ०१/०१/१९७९ रोजी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणेसंबंधी दि. २५/०८/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तींच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०९/०२/२०२६

**तहसिलदार कर्जत**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/२५४/२०२४
नेवासा दिनांक. ०५/०२/२०२६

अर्जदार श्री श्रीम-वैभव आसाराम कदम रा. खुणेगाव ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री श्रीम कु. वैदिक वैभव कदम रा. खुणेगाव यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा ११ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-वैदिक वैभव कदम, गावाचे नाव-भानसहिवरे, जन्म दिनांक-१२/१२/२०१४

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ च कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडधिकारी नेवासा**

### जाहीर प्रगटन

समस्त गावकरी चांदे बुद्रुक ता.कर्जत, जिल्हा अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात श्री.संदीप दिलीप जगधने रा.चांदे बुद्रुक ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर यांनी त्यांच्या नामे समर्थ संदीप जगधने यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

सदरील व्यक्तीचा जन्म चांदे बुद्रुक ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी दि. २८/११/२०१९ रोजी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणेसंबंधी ०६/०१/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तींच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

शिक्का

**तहसिलदार कर्जत**

## पान १ वरुन

### इराण-इस्रायल युद्धात कांदिवलीचा तरुण दीक्षित सोलंकीचा मृत्यू

जहाजावर एकूण २२ क्रू मेंबर्स होते, त्यापैकी १६ भारतीय होते. उर्वरित क्रू मेंबर्सना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. दीक्षित हा दीव येथील मच्छीमार व्यावसायिक अमृतलाल सोलंकी यांचा धाकटा मुलगा होता. महिनाभरापूर्वीच त्याच्या आईचे निधन झाले होते. आईच्या अंत्यसंस्कारानंतर तो पुन्हा जहाजावर परतला होता, पण दुर्दैवाने त्याला काळाने गाठले. या घटनेपूर्वी एका दिवस आधी हॉर्मुझच्या सामुद्रधुनीत 'एमव्ही स्कायलाईट' या जहाजावरही हल्ला झाला होता. या हल्ल्यात बिहारचा आशिष कुमार आणि राजस्थानचा दलीप सिंग हे दोन भारतीय खलाशी ४८ तासांपासून बेपत्ता आहेत. शोधकार्य सुरू असून, त्यांच्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. या दोन घटनांमुळे आतापर्यंत तीन भारतीय खलाशांचे बळी गेल्याची शक्यता आहे.

### बारामती अन् राहुरीची पोटनिवडणूक एकत्रच

मतदारसंघातील दिवंगत आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनानंतर आता लवकरच येथेही पोटनिवडणूक लागणार आहे. त्यासाठी दिवंगत शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी मिळावी अशी आमची इच्छा आहे. मात्र, यासंदर्भात मुख्यमंत्री निर्णय घेतील अशी प्रतिक्रिया भाजप प्रदेश उपाध्यक्ष सुजय विखे पाटील यांनी दिली. त्यामुळे, येथील उमेदवार कोण, याची चर्चा मतदारसंघात रंगली आहे.

अक्षय कर्डिले यांना उमेदवारी मिळावी अशी अनेक कार्यकर्त्यांची भावना आहे, तशा भावना त्यांनी माझ्याजवळ मांडल्या असून त्या मी वरिष्ठांना कळवल्याचं सुजय विखे यांनी म्हटलं आहे. बारामती आणि राहुरी विधानसभेची पोटनिवडणूक एकाच वेळी लागणार असून दोन्ही ठिकाणी नेत्यांच्या अकाली निधनाने जागा रिक्त झाल्या आहेत. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडीने सामंजस्याने तोडगा काढून या निवडणुका बिनविरोध व्हाव्यात, अशी भावना सुजय विखे यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, १७ ऑक्टोबर २०२५ रोजी शिवाजी कर्डिले यांचे निधन झाले होते. त्यानंतर, ६ महिन्यात पोटनिवडणूक घेणे आवश्यक आहे. त्यामुळे, लवकरच येथील निवडणुकांच्या घोषणा होतील.

अहिल्यानगर येथील माजी खासदार सुजय विखे पाटील यांची भाजप प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. या निवडीनंतर पहिल्यांदाच नगर शहरात आलेल्या सुजय विखे यांनी पक्ष संघटन मजबूत करणार असल्याचे म्हटलं आहे. भाजप हा सर्वदूर विस्तारलेला पक्ष आहे, यात नव्याने वाढ करण्याची फारशी आवश्यकता नाही. पक्ष वाढीपेक्षा पक्षातील कार्यकर्त्यांना समाधानी ठेवणं आणि न्याय देणं यावर भर देणार असल्याचं देखील विखे यांनी म्हटलं आहे.

## ट्रॅक्टर चोरणाऱ्या दोघांना ठोकल्या बेड्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

गंगापूर : तालुक्यातील शिंगी शिवारातून चोरीस गेलेल्या ट्रॅक्टर प्रकरणात गंगापूर पोलिसांनी कारवाई करत दोन चोरट्यांना गजाआड केले असून दोन आरोपी फरार असल्याने यांचा पोलिस शोध घेत आहे. गंगापूर तालुक्यातील शिंगी येथुन यांचे २८ फेब्रुवारीच्या मध्यरात्री सोनालिका कंपनीचे निळ्या रंगाचे ट्रॅक्टर अज्ञात इसमांनी चोरून नेल्याची तक्रार आरिफ शेख यांनी गंगापूर पोलिस ठाण्यात दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला होता होती. गंगापूर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुमारसिंग राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल विजय पाखरे यांनी वाहेगाव,गाढे पिंपळगाव व मुद्देश वाडगाव परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून गुप्त माहितीच्या आधारे कमलपूर (ता. श्रीरामपूर) येथील महानुभव मंदिराजवळ ट्रॅक्टर उभे असल्याचे समोर आले. पोलिसांनी तात्काळ धाव घेत अभिजित बाळासाहेब सुर्यवंशी व गौतम पुंजाहारी गायकवाड (दोघे रा. बाजाठाण, ता. वैजापूर) यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी दोन साथीदारांसह चोरी केल्याची कबुली दिली. चोरीस गेलेले ट्रॅक्टर जप्त करण्यात आले आहे.
तपास पोलीस करत आहे.

## श्री विश्वेश्वर नाथबाबांच्या त्रिदिनात्मक पुण्यतिथी सोहळ्यास प्रारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा बुद्रुक येथे श्री विश्वेश्वर नाथबाबा समाधी मंदिर येथे श्री विश्वेश्वर नाथबाबांच्या ३५ व्या त्रिदिनात्मक पुण्यतिथी सोहळ्यास बुधवारी (दि. ४ मार्च) धर्मध्वजारोहणाने भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. मंदिर प्रांगणात पार पडलेल्या कार्यक्रमात गाडगेबाबा भजनी मंडळाच्या सेवेकऱ्यांच्या उपस्थितीत नेवासा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष



डॉ. करणसिंह घुले, बालेंद्र पोतदार व गोकुळनाना जायगुडे यांच्या हस्ते ध्वजपूजन करून ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी देवस्थानचे विश्वस्त ज्ञाननाथ जायगुडे, प्रभाकर जायगुडे, जगन्नाथ जपे, भानुदास रेडे, बाळासाहेब मारकळी, शंकर परदेशी, पुजारी ज्ञानेश्वर सुरोशे, तसेच महिला भजनी मंडळाच्या सदस्यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुण्यतिथीनिमित्त दि. ४ ते ६ मार्चदरम्यान पहाटे काकडा, सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी भजन, सायंकाळी हरिपाठ, रात्री हरिकीर्तन व हरिजागर असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. सोहळ्याची सांगता श्री क्षेत्र देवगड संस्थानचे महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असल्याची माहिती देवस्थानतर्फे देण्यात आली. भाविकांनी कीर्तन व पारायणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खेळाडूंनी शिस्तीचे पालन करून उत्तम खेळ करणे गरजेचे : डॉ. सुस्मिता विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** प्रत्येक खेळामध्ये विजय किंवा पराजय होत असतो, त्यामुळे खेळाडूंनी खेळामध्ये नेहमी खेळाडू वृत्ती दाखवून व योग्य प्रकारे शिस्तीचे पालन करून उत्तम खेळ करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन लोकनेते पद्मभूषण डॉ बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे यांनी केले आहे.



लोकनेते पद्मभूषण डॉ बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषि शास्त्र संस्थेत आयोजित वार्षिक क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.यावेळी प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. दिलीप महाले , अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळ जाधव, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रा. स्वरांजली गाढे, कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष वर्पे तसेच सर्व विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते .

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थिनी प्रियांका चव्हाण हिने सर्व खेळाडूंना शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रमेश जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन क्रीडा शिक्षक प्रा.सीताराम वरखड यांनी केले.

## आठ वर्षीय टिपूचा पहीला रोजा पुर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**गंगापूर :** शहरातील मन्सुरी कॉलनी येथील टीपु इमरान शहा या ८ वर्षीय मुलाचा रमजान महीण्यातील पहीला रोजा (उपवास)पुर्ण केल्या बद्दल वडील इमरान शहा,अजोबा गुलाम शहा चुलते इरफान शहा, बसीर पठाण शहा,कलीम शहा,रहेमान शहा,हाजी बसीर शहा, शब्बीर शहा, रिजवान शहा,फारुक शहा, मौलाना जहीर,मुप्ती मतीन,जमाते अमीर मौलाना मोबीन, नगरसेवक अक्तर सय्यद, अब्बास कुरेशी,खालेद नाहदी,समद शहा,अनीस शहा,फयाज शहा, इब्राहीम शहा,शौकत शहा आदीसह मित्र परिवाराकडून अभीनंदन होत आहे.

## दहा वर्षीय ऊजेर शेखचा पहीला रोजा पुर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**गंगापूर :** अंधानेर तालुका कन्नड येथील ऊजेर सरफराज शेख वय १० वर्षीय मुलाने रमाजान महीण्यातील रोजा (उपवास )पुर्ण केला . त्या बद्दल वडील सरफराज शेख,बिलाल शेख,मोईन शेख,शकील शेख,हासीन शेख,मुस्तकीम शेख,मुक्तार शेख, सद्दाम शेख, रेहान शेख,साहील शेख,मझहर शेख, सद्दाम बागवान,सादीक शेख, मोहम्मद साद,अरशद सय्यद,आदीसह मित्र परिवाराकडून अभीनंदन होत आहे.

## कोपरगाव रस्ता रोको प्रकरणातील मराठा आंदोलकांची केस निकाली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

कोपरगाव : मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत सकल कोपरगाव मराठा आंदोलनकर्त्यांनी कोपरगाव साईबाबा साईबाबा कॉर्नर परिसरात व तालुक्यातील धामोरी रस्त्यावर रस्ता रोको आंदोलन केले होते. विना परवानगी रस्ता रोको करून रस्ता अडवून घोषणाबाजी केल्यामुळे कोपरगाव शहर पोलीस स्टेशनला २४ डिसेंबर २०२४ रोजी आंदोलनकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. यामध्ये साईबाबा कॉर्नरवर झालेल्या आंदोलनात अनिल गायकवाड, बाळासाहेब जाधव, विनय भगत, विकास आढाव, बाळासाहेब देवकर, अनिल




साळुंके संदीप डुंबरे तर धामोरी रस्त्यावर झालेल्या आंदोलनात नारायण भाकरे, ज्ञानदेव मांजरे ,सुनील मांजरे, नारायण मांजरे ,संदीप कुऱ्हाडे ,सचिन वाघ ,सुनील वाणी, अशोक भाकरे ,प्रकाश वाघ अदी मराठा आंदोलन कर्त्याचा समावेश होता.आरोपींच्या बाजूने कोपरगाव न्यायालयात ॲड योगेश खालकर यांनी काम पाहिले होते. न्यायालयात विना मोबदला ही केस त्यांनी लढवली होती. सर्व बाबींची माहिती घेत कोपरगाव कोर्टाने मराठा आंदोलन करताना क्लीन चिट देत ही केस निकाली काढली आहे. केस निकाली निघाल्याने मराठा आंदोलनकर्त्यांनी कोपरगाव येथे आनंद व्यक्त केला. मराठा पदाधिकारी व समाजाच्या वतीने ॲड योगेश खालकर यांचे विना मोबदला केस लढवल्यामुळे आभार मानले. येथून पुढे देखील मराठा समाजाच्या हितासाठी आंदोलन करण्याची जबाबदारी आमची राहील असे कोपरगाव मराठा आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

## गाथा पारायण सोहळ्यास भास्करगिरी बाबांची भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** येथील संत तुकाराम महाराज मंदिरात तुकाराम बीजेच्या सोहळ्या निमित्ताने गुरुवर्य उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या गाथा पारायण सोहळ्यास महंत राष्ट्रसंत गुरुवर्य भास्करगिरी बाबांनी भेट देऊन शुभाशीर्वाद दिले. यावेळी संत तुकाराम महाराज मंदिर देवस्थानचे विश्वस्त भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप यांच्या हस्ते भास्करगिरी बाबांचे संतपूजन करण्यात आले.जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांनी निर्माण केलेला गाथा हा मनुष्य जिवाच्या उद्धारासाठी असून पंचमवेद आहे. ज्याला यम देखील घाबरतो असे नाव त्यांचे आहे,जीवनात प्रत्येकाने गाथा ग्रंथाचे वाचन करावे असे आवाहन करून महंत उद्धव महाराज यांनी धर्म कार्याच्यमा माध्यमातून परमार्थ वृद्धिंगत केला असल्याचे गौरवोउद्गार त्यांनी यावेळी बोलतांना काढले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी नारायण महाराज ससे, ज्ञानेश्वर महाराज हजारे,लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे,बाळू महाराज कानडे,अमोल महाराज गोपाळ,भक्त मंडळ सेवेकरी शंकरराव लोखंडे,रामभाऊ खंडाळे,डॉ.मुरलीधर कराळे,उद्योजक राजेंद्र बोरा, देवस्थानचे विश्वस्त इंजिनियर सुनीलराव वाघ, जेष्ठ विधी तज्ञ काकासाहेब गायके, राजेंद्र परदेशी, बंडूभाऊ शिरकुले,दशरथराव मुंगसे, मुन्नाभाऊ चक्रनारायण,अनिल ताके, गोरक्षनाथ पठाडे, पप्पू डुकरे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते



## निधन वार्ता

### अहमद बागवान



**बेलापूर** - येथील केळीचे व्यापारी मोहम्मद हसनभाई बागवान व हमीद हसनभाई बागवान यांचे बंधू अहमद हसनभाई बागवान (वय ७४) यांचे अकाली निधन झाले आहे.

व्यापारी जाकीर हुसेन बागवान आणि शाकीर बागवान यांचे ते वडील तर रेहान जाकीर हुसेन बागवान आणि दानिश बिलाल बागवान यांचे ते आजोबा होत.

### संजय संघवी



**वैजापूर:** पंचायत समितीचे निवृत्त कर्मचारी संजय गणपत संघवी (वय ६२, शास्त्रीनगर) यांचे मंगळवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### विमलबाई शेळके



**नेवासा :** तालुक्यातील बाभुळवेढा येथील जुन्या पिढीतील गं भा विमलबाई नामदेव शेळके (वय ८०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, चार पुतणे, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर शेळके व कालिदास शेळके यांच्या त्या मातोश्री तर शेतकरी नेते पी. आर. जाधव यांच्या सासू माजी आ. शंकरराव गडाख यांचे स्वियसहाय्यक सुनील जाधव व अनिल जाधव यांच्या त्या आजी होत्या.

### बिपीन गायकवाड



**कोपरगाव** : तालुका मराठी पत्रकार संघाचे सदस्य बिपीन चंद्रभान गायकवाड (वय ५२) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. कोपरगाव तालुक्यातील जेऊर कुंभारी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, दोन भाऊ, दोन बहिणी, पत्नी, दोन मुली, मुलगा, असा परिवार आहे. ते बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक होते.

### गंगाधर पवार



**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील निपाणी वडगाव तसेच ह मु वांगी या ठिकाणी वास्तव्यास असलेले गंगाधर बाबासाहेब पवार (वय ५८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, दोन बंधू, तीन बहिण, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल पवार केतन पवार यांचे ते वडील तर वसंत पवार अशोक पवार, राजेन्द्र पवार, रघुनाथ व रामभाऊ पवार माजी सरपंच रविंद्र पवार यांचे ते बन्धु होत.


## change of name

Old name: is on my SAYED YASMIN BEGUM IS ON MY SCHOOL LIVING CERTIFICATE. and My New Name is YASMIN RASHID SHAIKH as on Aadhar Card Number is 9313 3094 0022 (03/03/2026)


## गंगापूर डीवायएसपी कार्यालयात फॉरेन्सिक व्हॅन दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** गंगापूर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात नव्याने दाखल झालेल्या अत्याधुनिक फॉरेन्सिक व्हॅनचे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश पालवे गंगापूर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक कुमारसिंग राठोड यांच्या हस्ते करण्यात आले.




शासनाने प्रत्येक उपविभागिय पोलिस अधिकारी कार्यालयासाठी ही फॉरेन्सिक व्हॅन देण्यात आली असून अत्यंत महत्त्वाची सुविधा आहे. यापूर्वी जिल्ह्यात कुठेही गुन्हा घडल्यास छत्रपती संभाजीनगर येथून पथक फॉरेन्सिक व्हॅन बोलवावे लागत असल्याने वेळेचा मोठा अपव्यय होत होता.आता पटनास्थळी तात्काळ पोहोचून वैज्ञानिक पध्दतीने पुरावे संकलित करता येणार असुन सात वर्षे किंवा त्यापुढील शिक्षेस पात्र असलेल्या गंभीर गुन्ह्यांमध्ये अनिवार्यपणे फॉरेन्सिक तपास केला जाणार आहे. गुन्हेगारांना कायद्याच्या कचाट्यात आणण्यासाठी आणि निर्दोषांना न्याय मिळवून देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे. या व्हॅनमुळे तपास प्रक्रियेला गती मिळून गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण वाढणार असल्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. निलेश पालवे यांनी फॉरेन्सिक व्हॅनचे उद्घाटन प्रसंगी बोलताना सांगितले .

गंगापूर उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय अंतर्गत गंगापूर, शिल्लेगाव, देवगाव रंगारी पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडणाऱ्या गुन्ह्यांच्या तपासासाठी या विशेष व्हॅनची मदत होणार आहे. यावेळी पोलीस हेड कॉन्स्टेबल भागवत खाडे, राजकुमार कुकलारे, सचिन काळे, विनोद पवार, प्रितेमेश भारङ्ज, रुपाली ढोले आदी उपस्थित होते. नवीन फॉरेन्सिक व्हॅनमुळे गुन्हे तपास प्रक्रियेला गती मिळणार असल्याचा विश्र्वास उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ निलेश पालवे यांनी व्यक्त केले.

# श्रीमद भागवत कथेप्रसंगी श्रीकृष्ण जन्मोत्सव पुष्पवृष्टीने साजरा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** येथे जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज बीजेच्या निमित्ताने संत तुकाराम महाराज मंदिर प्रांगणात महंत उध्दव महाराज मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली व भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप यांच्या वाणीतून सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथेत भगवान श्रीकृष्ण परमात्म्याचा जन्मोत्सव संत महंतांच्या उपस्थितीत पुष्पवृष्टी करून साजरा करण्यात आला.

यावेळी स्वामी सुनीलगिरी महाराज, बालयोगी ऋषिनाथ महाराज, नारायण महाराज ससे, लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, साहेबराव महाराज चावरे व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप यांनी भगवान श्रीकृष्ण अवताराचा प्रसंग जन्म प्रसंगी सांगितला.

भगवान श्रीकृष्ण परमात्म्याच्या प्रतिमेचे पूजन व श्रीकृष्ण बनलेल्या बालकाचे औक्षण महंत सुनीलगिरी महाराज व बालयोगी ऋषिनाथ महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. सोहळयाच्या प्रसंगी पुष्पवृष्टी करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी मार्केट कमिटीचे माजी सभापती शंकर लोखंडे,इंजि. सुनील वाघ, ग्रामविकास अधिकारी ज्ञानदेव शिंदे, नगरसेवक जालिंदर गवळी, पोलीस पाटील अनिल माकोणे, सतीश गायके, मनोज पारखे,रामराव बोरुडे, मच्छिंद्र गव्हाणे,दिगंबर लष्करे,राजेंद्र परदेशी,साबाचे सेवानिवृत्त अधिकारी शेजुळ, दत्तात्रय गायकवाड, रविंद्र गायके यांच्या हस्ते आरती करण्यात आली.


## नशिबाची परिक्षा

गुरुवार दि . ५ मार्च २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | जोड |
|---|---|---|---|
| सिंगल ५-१-९ मजबुत | | | |
| १२९ ४८० ६६० | २-४ | १३० १४९ ११२ | २७-०४-३१ ९८-४५ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | जोड |
|---|---|---|---|
| सिंगल ९-४-५ मजबुत | | | |
| १७९ २७८ ११५ | ७-६ | १५० २४० ३३० | ७४-३६-१० ५८-६२ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | जोड |
|---|---|---|---|
| सिंगल ४-७-९ मजबुत | | | |
| १५८ २४८ ७७० | ४-१ | १३७ ३८० ३३५ | ४०-७१-२३-६८-१९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 460 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 590 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द • ख • ल

## सचिन कांबळे यांच्या स्मरणार्थ पाणपोईचे उद्घाटन

शिराळ चिचोंडी : पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी येथे सालाबाद प्रमाणे यावर्षीही मढी मायंबा पायी जाणाऱ्या दिंडीसाठी मोफत पाणपोईचे उद्घाटन नाथपंथीय महंत विश्वनाथ महाराज पुणतांबा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी या या कार्यक्रमाला चिचोंडीचे युवा सरपंच श्रीकांत आटकर, उपसरपंच आबा गरुड, रावसाहेब कांबळे, रमेश जराड, पिनू दारकुंडे पत्रकार रमेश पाथरकर उपस्थित होते. यावेळी महाराज म्हणाले की जाणारे येणाऱ्या लोकांसाठी ग्लास भर पाणी मिळाले तरी आत्मा शांत होतो हे काम रावसाहेब कांबळे यांनी केले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. रावसाहेब कांबळे यांनी जोपर्यंत पाऊस पडत नाही तोपर्यंत पाणपोई चालूच राहील असे ते म्हणाले.

# ज्वारी काढणीची लगबग; मजुरी वाढल्याने शेतकरी चिंतेत



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यात सध्या ज्वारी काढणीची लगबग सुरू झाली असून अनेक शेतकऱ्यांनी काढणीला सुरुवात केली आहे. यंदा रब्बी हंगामात आवश्यक तेवढा आणि जोरदार पाऊस झाल्यामुळे ज्वारीसह गहू, हरभरा, तूर आणि कांदा या पिकांच्या विक्रमी पेरण्या झाल्या होत्या. कुकडीचे आवर्तन वेळेवर सुटले तसेच विहिरींमध्ये मुबलक पाणी उपलब्ध असल्याने पिकांना वेळेवर पाणी मिळाले. यंदा सौर पंप बसविल्यामुळे वीजपुरवठा सुरळीत राहिला.

मजुरीचा दर ८०० रुपयांवर

ज्वारी काढणीसाठी मजूर मिळणे कठीण झाले आहे. तालुक्यात शेतीकामासाठी मजुरांची टंचाई जाणवत असून शेतकऱ्यांना जादा पैसे देऊन मजूर बोलवावे लागत आहेत. पुरुष मजूर दररोज ८०० रुपये तर महिला मजूर ५०० ते ६०० रुपये रोजंदारी मागत आहेत. वाढत्या खर्चामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडले आहेत

पूर्वी रात्री उशिरा येणाऱ्या वीजेऐवजी आता दिवसाही पाणीपुरवठा शक्य झाल्याने शेतकरी समाधानी आहेत. चांगल्या दाबाने वीज मिळाल्याने भरणी वेळेत झाली. हवामान अनुकूल राहिल्याने पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव कमी झाला असून उत्पादन समाधानकारक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

तथापि, तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी फळबागा, पालेभाज्या, फळभाज्या आणि ऊस याकडे वळण घेतल्याने ज्वारीखालील क्षेत्र काही प्रमाणात घटले आहे. त्यामुळे ज्वारीचे एकूण उत्पादन जेमतेम असल्याचे चित्र आहे. ज्वारीच्या मशागतीपासून ते मळणीपर्यंतचा खर्च मोठा आहे.

बियाणे, पेरणी, खुरपणी, औषध फवारणी, वीजबिल आणि काढणी खर्च यांचा विचार करता मिळणारा बाजारभाव परवडणारा नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. सध्या चांगल्या दर्जाच्या मालदंडी ज्वारीला ४५ ते ५० रुपये दर मिळत असला तरी नव्या ज्वारीच्या आगमनानंतर दर घसरतात. सर्वसामान्य शेतकऱ्यांना पैशांच्या गरजेपोटी ज्वारीची विक्री करावी लागते. ज्वारी आरोग्यास उपयुक्त धान्य असल्याने मागणी वाढत असली तरी उत्पादन खर्च आणि कमी दर यामुळे शेतकरी ज्वारी पेरणी कमी करण्याच्या विचारात आहेत.

परिणामी भविष्यात ज्वारी उत्पादनात आणखी घट होऊन दरवाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# शेवगाव-पैठण रस्त्याची दुरवस्था

## रस्त्यावर धुळीचे मोठे साम्राज्य



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव** : दक्षिणकाशी मानल्या जाणाऱ्या पैठण येथे संत एकनाथ महाराज यांच्या पवित्र स्मृतिदिनानिमित्त साजरा होणारा नाथ षष्ठी उत्सव यंदा ९ मार्चपासून मोठ्या भक्तिभावात सुरू होत आहे. या उत्सवानिमित्त महाराष्ट्रासह इतर राज्यांतून हजारो दिंड्या आणि लाखो वारकरी पायी चालत पैठण येथे दाखल होत आहेत. टाळ-मृदुंगाच्या गजरात, भगव्या पताका फडकवत निघालेल्या दिंड्यांमुळे भक्ती, समर्पण आणि संत परंपरेचा अद्भुत संगम अनुभवायला मिळत आहे.

शेवगाव-पैठण मार्ग खड्डेमय असल्यामुळे वारकऱ्यांना या रस्त्याने चालताना मोठी कसरत करावी लागणार आहे. यावर्षी शेवगाव ते पैठण खुल्या कारागृहापर्यंतचा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत आहे. अहिल्यानगर जिल्हाच्या हद्दीतील या संपूर्ण मार्गावर मोठमोठे खड्डे पडले असून अनेक ठिकाणी डांबरीकरण उखडलेले आहे. हजारो वारकरी पायी प्रवास करत असताना या खड्डेमय रस्त्यामुळे वारकरी व वाहन चालक यांना शारीरिक त्रास सहन करावा लागतोय . विशेषतः वृद्ध, महिला आणि लहान मुलांसाठी हा प्रवास अधिकच कष्टदायक ठरत आहे. रात्रीच्या वेळी प्रकाशाची अपुरी व्यवस्था आणि खोल खड्डे या रस्त्यावर ज्या ठिकाणी काम चालू आहे त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचं ब्रिकेटेड लावलेली नसून यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे अपघात झाला तर या अपघाताला जबाबदार कोण ? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडलेला आहे.

शेवगाव नित्यसेवा हॉस्पिटल पासून ते घोटणपर्यंतचा रस्ता दुरुस्तीच्या कामासाठी खोदून ठेवण्यात आला आहे. परिणामी वाहनांची सततची ये-जा आणि वारकऱ्यांच्या पायी चालण्यामुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे. धुळीमुळे वारकरी तसेच स्थानिक नागरिकांना श्वसनाचे त्रास, डोळ्यांची जळजळ आणि अस्वस्थता जाणवत आहे. वाहनांची वाढती गर्दी, दिंड्यांची संख्या आणि अरुंद रस्ता यामुळे वाहतूक कोंडीची समस्या अधिक तीव्र झाली आहे.

### भक्तीच्या सोहळ्यात अडथळा नको

नाथ षष्ठी उत्सव हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून संत परंपरेची आणि सामाजिक एकात्मतेची साक्ष देणारा सोहळा आहे. लाखो एकनाथ भक्त पायी चालत पैठणला पोहोचतात, ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची गौरवशाली परंपरा आहे. या पार्श्वभूमीवर या रस्त्यावर काम करत असलेले ठेकेदार व अधिकारी याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करताना दिसत आहे.

## आनंद हॉस्पिटलला यश फाऊंडेशनकडून ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव** : ग्रामीण भागातील रुग्णांना अधिक सक्षम व दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी या सामाजिक उद्देशाने ढोरजळगांव येथील डॉ. देविदास देशमुख यांच्या आनंद हॉस्पिटलला यश फाऊंडेशनच्या वतीने ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे श्वसनासंबंधी आजार असलेल्या रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून आपत्कालीन परिस्थितीत उपचार अधिक प्रभावीपणे करता येणार आहेत. कार्यक्रमात बोलताना डॉ. सुधाकर लांडे यांनी ग्रामीण रुग्णांसाठी हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

सामाजिक कार्यात यश फाऊंडेशनचे योगदान उल्लेखनीय असल्याचेही त्यांनी नमूद केले. माजी तालुकाध्यक्ष बापुसाहेब पाटेकर यांनी या उपकरणामुळे गरजू रुग्णांना निश्चित लाभ होणार असल्याचे सांगत असे उपक्रम भविष्यातही राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. यश फाऊंडेशनचे उपाध्यक्ष जयकुमार देशमुख यांनी समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेतून संस्था कार्यरत असून यापूर्वी वितरित केलेल्या ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरमुळे अनेकांचे जीव वाचविण्यास मदत झाली असल्याचे सांगितले. कार्यक्रमास अशोकराव देवढे, भाऊराव गरड, अनंता उकिर्डे, डॉ. प्रदीप पाटेकर आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. देविदास देशमुख यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार संतोष हंबर यांनी मानले.



# बार्टीचा राज्यव्यापी उपक्रम

## आ. राजळेंना डॉ. आंबेडकरांचा पूर्णाकृती पुतळा भेट



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र राज्यातील विधानसभा व विधानपरिषद सदस्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा भेट देण्याचा प्रेरणादायी उपक्रम राज्यभर राबविण्यात येत आहे. येथील आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

बार्टीचे महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे तसेच विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम साकार होत आहे. राज्यातील लोकप्रतिनिधींना डॉ. आंबेडकरांच्या कार्याची आणि विचारांची सातत्याने जाणीव राहावी, तसेच त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहिताचे निर्णय घ्यावेत, हा या मागचा मुख्य हेतू आहे. शेवगाव-पाथर्डी मतदारसंघाच्या लोकप्रिय आमदार मोनिका ताई राजळे यांना बार्टी शेवगाव तालुका समता दूत वसंत बडे आणि पाथर्डी तालुका समता दूत रविंद्र कटके यांच्या हस्ते पूर्णाकृती पुतळा प्रदान करण्यात आला.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी राजगुरू, प्रांताधिकारी प्रसाद मते तसेच तहसीलदार उद्धव नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्याय, बंधुता आणि समतेच्या विचारांचा पुनरुच्चार करण्यात आला.

## डीपीआरवरून चेडे-झावरे वाद चिघळला

### परस्परांवर तीव्र शब्दांत टीका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर** : नगरसेवक अशोक चेडे आणि सुजित झावरे पाटील यांच्यातील वाद मंगळवारी अधिकच तीव्र झाला. चेडे यांना डीपीआरचा लाँग फॉर्म तरी माहिती आहे का? असा सवाल झावरे यांनी उपस्थित केल्यानंतर चेडे यांनी पत्रकार परिषदेत प्रत्युत्तर देत राजकीय वातावरण तापवले. क्लासरूमबाहेरची मदत घेऊन बारावी उत्तीर्ण झालेल्यांनी मला डीपीआर शिकवण्याचा आव आणू नये.

मी १९९४ साली एम.एस्सी. केमिस्ट्री पदवीधर आहे, असे सांगत चेडे यांनी झावरे यांच्या टीकेचा समाचार घेतला. 'छोटा घटक' या उल्लेखावर बोलताना त्यांनी नगरसेवक व जिल्हा परिषद सदस्यांचा प्रोटोकॉल समान असल्याचे नमूद केले. शहर विकास आराखड्याविषयी झावरे यांची विधाने ही केवळ प्रसिद्धीसाठी असल्याचा आरोप करत चेडे म्हणाले, फटाके वाजवून धूर केला म्हणजे विकास होत नाही; त्यासाठी अभ्यास, दम आणि प्रशासनाशी समन्वय आवश्यक असतो. आमदार काशिनाथ दातेसर यांच्याबाबत झालेल्या टीकेवरही चेडे यांनी प्रत्युत्तर देत जिल्हा परिषद निवडणुकीतील पराभवाची आठवण करून दिली.

दरम्यान, परस्परांवरील आरोप-प्रत्यारोपांमुळे तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून या वादाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पुरंदरमध्ये स्वच्छ भारत मिशन अंतर्गत महिलांना प्रशिक्षण..

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे/सासवड** : पुणे जिल्हा परिषदेचा पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या वतीने व नवी दिल्ली येथील एएफसी इंडिया लि. यांच्या सहयोगाने स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा दोन अंतर्गत संपूर्ण पुणे जिल्हयातील १३ तालुक्यात नुकतेच दोन दिवसीय प्रशिक्षण पार पडले.

पुरंदर तालुक्यात चोवीस गावांचा एक गण याप्रमाणे नीरा, परिंचे तसेच सासवडला दोन अशा चार ठिकाणी तालुक्यातील सर्व ग्रामसखी तसेच समुह गटातील प्रत्येकी दोन महिला अशा सुमारे ३०० हून अधिक महिलांनी यात सहभागी होत स्वच्छतेचे धडे गिरविले. कचऱ्याचे विलगीकरण, सार्वजनिक स्वच्छता, वर्तणुक बदल अशा स्वरूपातील या प्रशिक्षणात ओला व सुका कचरा, शोषखड्डा, सांडपाणी, गाव पातळीवरील ग्राम पंचायत कार्यालय, अंगणवाडी, शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र अशा सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता व त्यातील आपले योगदान आणि मानसिकता या विषयावर यशदा मधुन विशेष प्रशिक्षण घेऊन आलेले प्रवीण प्रशिक्षक सूर्यकांत शिवले व कुंडलिक कोहिनकर यांनी महिलांना दोन दिवसांत उत्तम प्रबोधन केले.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील व पुरंदरच्या गटविकास अधिकारी प्रणोती श्री श्रीमाळ यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली विस्तार अधिकारी बबन चखाले व संतोष नेवसे यांनी यामध्ये सहभाग घेतला. प्रिया गायकवाड तसेच काजल गायकवाड यांनी प्रशिक्षण यशस्वी करण्यात मौलिक कामगिरी बजावली. सर्व सहभागी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देण्यात आले.

## गैरहजेरीच्या निषेधार्थ अधिकाऱ्याच्या खुर्चीला 'बेशरम'चा हार

### संभाजी ब्रिगेडचे आंदोलन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग, श्रीगोंदा येथील एका अधिकाऱ्याच्या कथित गैरहजेरीविरोधात संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला. जबाबदार अधिकारी पांढरे यांच्या खुर्चीला 'बेशरम'चा हार घालून गांधी मार्गाने आंदोलन करण्यात आले. कार्यकर्त्यांचा आरोप आहे की संबंधित अधिकारी कार्यालयात नियमित हजर राहत नाहीत. मागील सोमवारी संपर्क साधला असता नगरला आहे असे सांगण्यात आले; मात्र आठ दिवसांनंतरही कार्यालयात ते आढळले नाहीत.

फोन करूनही प्रतिसाद मिळाला नसल्याचे सांगण्यात आले. संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष नाना शिंदे यांनी इतर जिल्हा मार्ग १४१ श्रीगोंदा-टाकळी कडेवळीत रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याचे सांगितले. खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढला असून ५ जानेवारी रोजी जनता दरबारात आमदारांना निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला. जबाबदारीची खुर्ची रिकामी असेल तर जनतेचा संयमही रिकामा होतो, असा टोला लगावत ९ मार्च रोजी कार्यालयासमोर 'दशक्रिया विधी' आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा ब्रिगेडने दिला आहे.

## अष्टविनायक महामार्गावर इचकेवाडी,बंटी धाब्याजवळ तात्काळ गतिरोधक बसवा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई** : शिरूरच्या पश्चिमेकडील कवठे येमाई इचकेवाडी परिसरातुन जाणाऱ्या गतिमान वाहातून असलेल्या अष्टविनायक महामार्गावर बंटी धाब्याजवळ व त्याच परिसरात इतर ही ठिकाणी वारंवार होणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर तात्काळ झिक झाक गतिरोधक (स्पीड ब्रेकर) बसविण्याची मागणी शिरूर पंचायत समिती सदस्या कांचन राजेश सांडभोर यांनी केली आहे. रस्ता गतिमान झाल्याने या महामार्गावरून वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ सुरु असते. धाबा, स्थानिक दुकाने आणि गावाकडे,वस्ती वाडीकडे वळणारे अनेक रस्ते यामुळे पादचारी, शालेय विद्यार्थी,शेतकरी,दुग्धव्यवसायिक तसेच नागरिकांना रस्ता ओलांडताना अनेकदा मोठा धोका निर्माण होतो. याच अष्टविनायक महामार्गावर कवठे येमाई गावठाण,इचकेवाडी,खार ओढा,काळूबाई नगर,बंटी ढाब्या नजीक अनेकदा किरकोळ तसेच गंभीर स्वरूपाचे अपघात घडले असून नागरिकांना शारीरिक व आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे.तर अनेकांना अपघातात जीव देखील गमवावे लागले आहेत.

कांचनताई सांडभोर यांनी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग व प्रशासनास या परिसरात महामार्गावर तात्काळ गतिरोधक, सूचना फलक आणि वेगमर्यादा दर्शविणारे बोर्ड लावण्याची मागणी केली आहे. तसेच रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाशयोजना करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. स्थानिक नागरिकांनीही या मागणीला पाठिंबा दर्शवून प्रशासनाने त्वरित कारवाई करावी, अन्यथा या प्रश्नी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

## काष्टी मंडळात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : नागरिकांच्या महसूल विषयक तक्रारींचे त्वरित निवारण करून विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी काष्टी (ता. श्रीगोंदा) येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' (टप्पा क्र. १) आयोजित करण्यात आले आहे. शनिवार, ७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता हे शिबिर पार पडणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर व तहसीलदार सचिन डोंगरे यांनी दिली. शिबिरात प्रलंबित फेरफार, अभिलेख दुरुस्ती, जिवंत ७/१२ नोंदी, भोगवटदार वर्ग रूपांतरण, तुकडेबंदी प्रकरणे यांसह डिजिटल ७/१२ व ८-अ उतारे वाटप करण्यात येणार आहे. तसेच उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्रांचे अर्ज स्वीकारून निकाली काढले जाणार आहेत. कार्यक्रमास आमदार विक्रमसिंह पाचपुते उपस्थित राहणार आहेत.

# भेडसावस्ती येथे महादेव महाराज सुवर्ण महोत्सवाची उत्साहात सांगता



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर** : तालुक्यातील वासुंदे व कर्जुले हर्या गावांच्या हद्दीवरील भेडसावस्ती येथे भगवान श्री महादेव महाराज सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित तीन दिवसीय सप्ताहाची सांगता मंगळवार, दि. ३ मार्च रोजी भक्तीभावात पार पडली. या समारंभास आमदार काशिनाथ दाते उपस्थित राहून हभप पांडुरंग महाराज गिरी वावीकर यांच्या कीर्तनाचा लाभ घेतला. यावेळी ग्रामस्थांनी महादेव मंदिरासमोर सभामंडप उभारण्याची मागणी केली.

त्यावर आमदार दाते यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यास चालू आर्थिक वर्षातच सभामंडपाचे काम पूर्ण करून देण्याची ग्वाही दिली. तरुणांनी शिस्त व संस्कार जपत पन्नास वर्षांची परंपरा जपली असल्याचे त्यांनी कौतुकपूर्वक नमूद केले. तसेच जिल्हा परिषद बांधकाम समितीचे सभापती असताना कर्जुले हर्या गावासाठी सात कोटी रुपयांहून अधिक विकासकामे मार्गी लावल्याचे त्यांनी सांगितले. सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलो असल्याने जनतेच्या अडचणींची जाणीव आहे. सर्वसामान्यांच्या कामासाठी कधीही कमी पडणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास विविध मान्यवर, माजी सरपंच, पदाधिकारी तसेच हर हर महादेव मित्र मंडळ व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्ती, परंपरा आणि विकासाचा संदेश देणारा हा सोहळा उत्साहात पार पडला.

आमदार दाते सर शांत व संयमी नेतृत्व आहे. समाजातील सर्व घटकांना विचारात घेऊन त्यांनी केलेले कार्य हेच त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य आहे, असे गौरवोद्गार हभप पांडुरंग महाराज गिरी वावीकर यांनी काढले.

## जगद्गुरु तुकारामांनी उभारलेला 'शेतू' जगाच्या उद्धारासाठीच : हभप संजय महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर** : तालुक्यातील वडझिरे येथे श्रीसंत तुकाराम महाराज बिजोत्सवानिमित्त अखंड हरीनाम सप्ताहाला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सुवर्णमहोत्सवी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने पार पडलेल्या भव्य कीर्तन सोहळ्यात नवव्या दिवशी रामायणाचार्य हभप संजय महाराज पाचपोर यांनी कीर्तनरूपी पुष्प अर्पण केले. तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम, धन्य तुकोबा समर्थ त्याने केला हा पुरुषार्थ या कवी रामेश्वर भट्ट यांच्या अभंगावर त्यांनी प्रभावी निरूपण केले. यावेळी बोलताना पाचपोर महाराज म्हणाले की, संत तुकारामांच्या नामस्मरणात अपार शक्ती असून 'तुकाराम' नामाचा जप केल्यास मृत्यूदेवता यमही थरथर कापते. जगद्गुरू तुकारामांनी उभारलेला आध्यात्मिक 'शेतू' हा केवळ जगाच्या उद्धारासाठीच होता. ते विष्णूचे अवतार असून त्यांच्या नामात भक्तरक्षणाची अद्भुत ताकद आहे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास आमदार काशिनाथ दातेसर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वडझिरे येथील अखंड ५० वर्षांची सेवा अभिमानास्पद असल्याचे सांगत त्यांनी साप्ताह परंपरा कायम ठेवण्याचे आवाहन केले.कीर्तन श्रवणासाठी भाविकांची मोठी उपस्थिती होती.



# सौर प्रकल्प बसवूनही लाखोंची वीजबिले

## शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : शासनाच्या सौर ऊर्जा योजनेवर विश्वास ठेवून लाखो रुपयांची गुंतवणूक करणाऱ्या शेतकऱ्यांनाच अवाजवी वीजबिलांचा फटका बसत असल्याची धक्कादायक प्रकरणे जिल्ह्यात समोर आली आहेत. सौर प्रकल्प बसविल्यानंतर वीजबिलात बचत होण्याऐवजी उलट लाखोंची थकबाकी दाखवून वीजपुरवठा खंडित करण्याचे इशारे दिले जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी महावितरणच्या ग्रामीण उपविभागीय कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेडून संबंधित प्रकरणांची तातडीने तांत्रिक चौकशी करण्याची मागणी केली. ३ किलोवॅट सौर प्रकल्पानंतरही हजारोंची थकबाकी टाकळी काझी येथील शेतकरी श्रीमंत उर्फ सचिन म्हस्के यांनी महावितरणची विधिवत परवानगी घेऊन ३ किलोवॅट क्षमतेचा सौर प्रकल्प उभारला. सौर ऊर्जेमुळे वीजबिलात मोठी घट होण्याची अपेक्षा असताना, त्यांना उलट हजारोंची थकबाकी दाखवून अवाजवी बिल पाठवण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. थकबाकी न भरल्यास वीजपुरवठा खंडित करण्याचा इशाराही देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे देवगाव येथील शेतकरी गुलाब मोहन वामन यांनी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ३ किलोवॅट सौर प्रकल्प बसविला. मात्र त्यांना तब्बल ४ लाख ३२ हजार रुपयांचे अविश्वसनीय व तांत्रिकदृष्ट्या अशक्यप्राय बिल पाठवण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. नेट-मीटरिंगमध्ये त्रुटींचा आरोप शेतकऱ्यांच्या मते, नेट-मीटरिंगची योग्य वजावट न करणे, मीटर रीडिंगची अचूक तपासणी न करणे आणि प्रणालीतील त्रुटी वेळेत दुरुस्त न करणे या बाबींमध्ये गंभीर निष्काळजीपणा झाला आहे. सौर योजनेचा मुख्य उद्देश वीजबिलात बचत करणे हा असताना उलट प्रचंड थकबाकी दाखविणे हे नियमबाह्य व योजनेच्या उद्देशालाच हरताळ फासणारे असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

सौर प्रकल्प बसवल्यानंतरही लाखो रुपयांची बिले कशी आकारली जात आहेत? नेट-मीटरिंगची अंमलबजावणी योग्य पद्धतीने का होत नाही? चुकीचे बिल देऊन वीजपुरवठा खंडित करण्याचा अधिकार कोणत्या नियमांनुसार वापरला जात आहे? असे सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केले. सौर प्रकल्प बसवणाऱ्या शेतकऱ्यांवर लाखोंची बिले लादून त्यांना आर्थिक संकटात ढकलण्याचा प्रयत्न आम्ही सहन करणार नाही. ही प्रकरणे तातडीने मार्गी लावली नाहीत तर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा संतप्त शेतकऱ्यांनी दिला आहे.

द • ख • ल

## घोडशाखा डावा कालवा पोट चाऱ्यांतील झाडेझुडपे हटवली

**लोणी धामणी :** कुकडी प्रकल्प अंतर्गत आंबेगाव तालुका परिसरातील घोडशाखा डावा कालव्यातील थोरांदळे, खडकी, नागापूर व जाधववाडी येथील पोट चाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात काटेरी झाडेझुडपे वाढली होती. त्यामुळे पाण्याचा प्रवाह अडथळला जात असून कालवा व पोट चाऱ्यांना धोका निर्माण होण्याची शक्यता होती. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका युवक अध्यक्ष विशाल जालींदर वाबळे यांनी कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग, नारायणगाव यांना निवेदन दिले होते. निवेदनाची दखल घेत जलसंपदा विभागाने यंत्राच्या साहाय्याने संबंधित गावांतील पोट चाऱ्यांमधील झाडेझुडपे काढून चाऱ्या मोकळ्या केल्या.यावेळी जलसंपदा विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच मानकादेवी पाणी वाटप संस्था, खडकीचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



## फाल्गुन पौर्णिमेनिमित्त धामणीत खंडोबाची श्रीखंड पूजा उत्साहात

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यातील धामणी येथील पुरातन कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान मंदिरात मंगळवारी (दि. ३ मार्च) फाल्गुन पौर्णिमा (धुलीवंदन) निमित्त स्वयंभू सप्तशिवलिंगाची पारंपरिक श्रीखंड पूजा व दुग्धाभिषेक उत्साहात पार पडला. यावेळी गाभाऱ्यात झेंडू व अष्टर फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. स्वयंभू सप्तशिवलिंगावर सुगंधी अत्तर व केशरमिश्रित भंडाऱ्याचा लेप करून सप्तरंगांची उधळण करण्यात आली. तसेच खंडोबा, म्हाळसाई व बाणाई यांच्या मूर्तींना वस्त्रालंकार करून लोभस सजावट करण्यात आली होती. पहाटे मंदिर परिसरात कपाळभर भंडारा लावत 'सदानंदाचा येळकोट'च्या जयघोषात नऊ जोडप्यांच्या हस्ते दुग्धाभिषेक व रुद्राभिषेक करण्यात आला. त्यानंतर आरती संपन्न होऊन मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले.कार्यक्रमासाठी सेवेकरी, भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दिवे परिसरात होळी उत्साहात साजरी

**दिवे, सासवड :** दिवे परिसरात होळी सण पारंपरिक पद्धतीने आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. झेंडेवाडी येथील श्रीनाथ म्हस्कोबा महाराज मंदिरासमोर सरपंच अमर झेंडे तसेच श्रीनाथ म्हस्कोबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अनिल झेंडे यांच्या हस्ते विधिवत पूजा करून होळी प्रज्वलित करण्यात आली.तसेच दिवे गावठाणातील कातोबानाथ मंदिरासमोर पोलीस पाटील बाळासाहेब झेंडे यांनी सायंकाळी पारंपरिक पद्धतीने पूजा–अर्चा करून होळी पेटविली. यावेळी पुजारी दिगंबर दिवेकर व विजय दिवेकर यांनी पौराहित्य केले. बाळू आढाळगे व अर्जुन आढाळगे यांच्या सनई वादनाने वातावरण भक्तिमय झाले.=होळीच्या अग्नीत निराशा, आळस आणि दारिद्र्याची आहुती देत सर्वत्र सुख, शांती आणि आरोग्य नांदावे, अशी मंगलकामना करण्यात आली. बालकांनी एकमेकांना रंग लावत आनंद व्यक्त केला. घरोघरी पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून होळी पूजन करण्यात आले.या प्रसंगी गणपत शितकल, आप्पा टिळेकर, सुहास दिवेकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मार्चच्या सुरुवातीलाच उन्हाचा तीव्र चटका

### शेतीपिके, जनावरांचा चारा, पिण्याचे पाणी व नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम ?

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**प्रा.सुभाष शेटे**

**कवठे येमाई :-** राज्यासह पुणे जिल्ह्यात मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच तापमानात लक्षणीय वाढ झाल्याने नागरिकांना उन्हाचा तीव्र चटका बसू लागला आहे. नेहमी एप्रिल–मे महिन्यात जाणवणारी उष्णतेची तीव्रता यंदा मार्चमध्येच जाणवत असल्याने शेती, पशुधन, पाणीपुरवठा आणि आरोग्य व्यवस्थेवर परिणाम होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

**शेतीपिकांवर परिणाम :**
अचानक वाढलेल्या तापमानामुळे गहू, हरभरा, कांदा, भाजीपाला यांसारख्या रब्बी पिकांवर ताण येत आहे.पिकांची वाढ खुंटणे,दाणे भरण्याची प्रक्रिया अपूर्ण राहणे,त्यामुळे उत्पादनात घट येऊ शकते,फुलगळ व पानगळ वाढणे उष्णतेमुळे जमिनीतील आर्द्रता झपाट्याने कमी होत असून शेतकऱ्यांना पिकांना अतिरिक्त पाणी द्यावे लागत आहे. त्यामुळे वीज वापर आणि इतर खर्च वाढत आहे.

**जनावरांच्या चाऱ्याची टंचाई :**
उन्हामुळे कुरणातील गवत लवकर वाळत आहे. हिरवा चारा कमी उपलब्ध होत असल्याने पशुपालकांना सुक्या चाऱ्यावर अवलंबून राहावे लागत आहे.दुधाळ जनावरांचे दूध उत्पादन घटणे,जनावरांमध्ये अशक्तपणा,उष्माघाताचा धोका ही होण्याची शक्यता जाणकारांमधून व्यक्त होत आहे.

**पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर :**
अनेक ठिकाणी तलाव, विहिरी आणि बोअरवेलमधील पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. ग्रामीण भागात टँकरची मागणी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. पाणीटंचाई तीव्र होण्याची चिन्हे आत्ताच दिसत असून पाण्यासाठी नागरिकांची धावपळ होण्याची शक्यता ही नाकारता येत नाही.शेतीसाठी पाणी सिंचनावर देखील मर्यादा पडण्याची शक्यता आहे.

**नागरिकांच्या आरोग्यावर होऊ शकतो परिणाम :**
मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाच्या वाढत्या तीव्रतेमुळे उष्माघात, डिहायड्रेशन, डोकेदुखी, त्वचारोग, रक्तदाबातील चढउतार यांसारख्या तक्रारी वाढू शकतात. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्रमिक वर्ग यांनी विशेष काळजी घेणे गरजेचे ठरणार आहे. त्या करीता दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हात जाणे टाळावे,भरपूर पाणी व द्रवपदार्थ घ्यावेत,डोक्यावर टोपी/रुमाल वापरावा,जनावरांना सावली व स्वच्छ पाणी उपलब्ध करून द्यावे.

**प्रशासनाकडून अपेक्षित उपाययोजना :**
सुरु असलेल्या कडक उन्हाच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठ्याचे योग्य ते नियोजन,प्रसंगी जनावरांसाठी चारा छावण्यांची तयारी,आरोग्य शिबिरे,शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन व मदत मिळणे गरजेचे असेल.मार्चच्या सुरुवातीलाच वाढलेली उष्णता ही आगामी एप्रिल–मे महिन्यात अधिक तीव्र होण्याची शक्यता दर्शवित आहे. त्यामुळे प्रशासन, शेतकरी आणि नागरिकांनी आतापासूनच दक्षता घेणे आवश्यक ठरत आहे.




## स्व. अजित पवार यांच्या प्रथम मासिक स्मृतिदिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर ३२७ जणांचे रक्तदान



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** विद्या प्रतिष्ठानच्या तझघइखएढ (कमलनयन बजाज अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्था), बारामती येथे स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या प्रथम मासिक स्मृतिदिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस) विभागामार्फत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत पार पडलेल्या या शिबिरामध्ये एकूण ३२७ रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला. युवक–युवतींनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवून सामाजिक जबाबदारीची जाणीव दृढ केली. संकलित रक्त विविध रुग्णालयांतील गरजू रुग्णांच्या उपचारासाठी उपयोगी पडणार आहे.या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या व्यवस्थापनाचे मार्गदर्शन लाभले. सचिव नीलिमा ताई गुजर आणि प्राचार्य डॉ. एस. बी. लांडे यांनी विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणीवेचे विशेष कौतुक केले. सर्व अध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.राष्ट्रीय सेवा योजना (छडड) कार्यक्रम अधिकारी डॉ. उमेश जगदाळे व सौ. श्रीमंती रोकडे यांनी शिबिराचे नियोजन. व समन्वय प्रभावीपणे पार पाडले. विद्यार्थी समन्वयक सिद्धांत शितोळे, अथर्व कावळे, जलोघ पवार, शिवम मेहेरकर, ओम ठोंबरे, संस्कार मदने तसेच छडड स्वयंसेवकांनी नोंदणी, रक्तदात्यांचे मार्गदर्शन आणि संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी यशस्वीरित्या सांभाळली. रक्तदान हे श्रेष्ठदान या भावनेतून आयोजित या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, सामाजिक उत्तरदायित्व आणि मानवी मूल्यांची जाणीव अधिक दृढ झाली. स्व. अजित दादा पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त राबविण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

> विद्यार्थ्यांनी सामाजिक जाणीव ठेवून रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला, ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे. अशा उपक्रमांमधून सेवाभाव आणि मानवतेची मूल्ये अधिक दृढ होतात.''
> **नीलिमा गुजर, सचिव – विद्या प्रतिष्ठान**
>
> ----------------------
>
> स्व. अजित दादा पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिर हे विद्यार्थ्यांच्या सामाजिक उत्तरदायित्वाचे प्रतीक आहे. ३२७ रक्तदात्यांचा सहभाग हा युवा शक्तीचा सकारात्मक संदेश देणारा आहे.
> **डॉ. एस. बी. लांडे,प्राचार्य – विद्या प्रतिष्ठान**

## आळंदीच्या जडणघडणीत सुरेश वडगावकर यांचे मोलाचे योगदान : प्रशांत कुऱ्हाडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** तीर्थक्षेत्र आळंदीच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासात माजी नगराध्यक्ष सुरेश वडगावकर यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी केले. सुरेश वडगावकर यांच्या सहस्र चंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.राजकारणासोबत शिक्षण व समाजकारण क्षेत्रात वडगावकर यांनी भक्कम पायाभरणी केली. विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी दूरदृष्टीने काम केल्याचा उल्लेख कुऱ्हाडे यांनी केला. यावेळी नगरपरिषदेच्या वतीने मानपत्र, शाल–श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन वडगावकर यांचा गौरव करण्यात आला.
कार्यक्रमास हभप नारायण महाराज जाधव, आमदार बाबाजी काळे, आमदार बापूसाहेब पठारे, आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक संस्था आणि वारकरी संप्रदायातील मान्यवर उपस्थित होते.
सायंकाळी हभप जगन्नाथ महाराज पाटील यांच्या कीर्तनातून वडगावकर यांच्या जीवनकार्याचा आढावा घेण्यात आला. ८३ मृदंगांच्या निनादात हरिपाठ सादर करण्यात आला. 'माझ्या वडिलांची मिराशी गा देवा' या अभंगाचे सादरीकरण पंडित कल्याण गायकवाड यांनी केले.ग्रंथतुला, हस्तलिखित ज्ञानेश्वरी प्रकाशन, संतपूजन, आरोग्य शिबिर, रक्तदान, विविध स्पर्धा आणि वृक्षारोपण अशा उपक्रमांनी सोहळ्याची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे आभार अजित वडगावकर यांनी मानले.

## वर्षा नाईक यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट संघटन पुरस्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** युवा क्रांती फाउंडेशन अंतर्गत युवा क्रांती पोलीस मित्र संघटना यांच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक, महिला जनजागृती तसेच युवक–युवती संघटन चळवळीत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पुणे, धनकवडी येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या वर्षा नाईक यांना सन २०२६ चा उत्कृष्ट संघटन पुरस्कार जाहीर झाला आहे. संस्थापक अध्यक्ष रविंद्र सूर्यवंशी यांनी ही माहिती दिली.



गेल्या अनेक वर्षांपासून वर्षा नाईक या संघटनेच्या माध्यमातून शहरी व ग्रामीण भागातील युवक–युवतींना मार्गदर्शन, महिला संघटन बांधणी आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे कार्य अधिक गतिमान झाले असून अनेक महिला व युवक संघटनेशी सक्रियपणे जोडले गेले आहेत.

हा पुरस्कार लवकरच शिर्डी येथे आयोजित चौथ्या वर्धापनदिन सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर विविध क्षेत्रांतून वर्षा नाईक यांचे अभिनंदन करण्यात आले.

## शिक्रापूरात महिलेची नोकरीच्या आमिषाने फसवणूक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील एका महिलेची नोकरीला लावण्याच्या आमिषाने तब्बल तीन लाख वीस हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे पवन देवराम काळे व सुयेश शिंदे या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिक्रापूर (ता. शिरुर) येथील बजरंगवाडी येथे राहणाऱ्या सुप्रिया पावसे या नोकरी शोधत असताना त्यांची ओळख पवन काळे सोबत झाली त्यावेळी पवन याने आईसिआयसिआय विवेक जीवन मध्ये नोकरी असल्याचे सांगून आमचे बॉस सुयेश शिंदे हे तुमची परीक्षा घेतील असे म्हणून आधार कार्ड व कागदपत्रे पाठवून काही पैसे ऑनलाईन भरायला सांगितले, त्यांनतर सुप्रिया यांसह त्यांच्या पतीला वेळोवेळी काही पैसे व कागदपत्रे पाठवायला सांगितले, दरम्यान दोघांनी सुप्रिया व त्यांच्या पतीकडून नोकरीच्या आमिषाने तब्बल तीन लाख वीस हजार रुपये घेऊन काही दिवसांनी सुप्रिया पावसे यांना बनावट जॉईनिंग लेटर देऊन .त्यांची फसवणूक केली, घडलेल्या प्रकाराबाबत सुप्रिया सुरेश पावसे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी पवन देवराम काळे व सुयेश शिंदे या दोघांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विजय मस्कर हे करत आहे.



## अतिक्रमणांबाबत वनविभागाची संशयास्पद भूमिका

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वळती :** महाराष्ट्र वन विभागच्या हद्दीत वळती आंबेगाव तालुक्यातील लौकी गावाजवळ मोठ्या प्रमाणात अतिक्रमण व मुरूम उत्खनन झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कंपार्टमेंट क्र. २३४, गट क्र. ८० मध्ये २७ जानेवारी ते १४ फेब्रुवारीदरम्यान पोकलेन मशिन व डंपरच्या सहाय्याने उत्खनन करून मुरूमाची वाहतूक करण्यात आल्याचे स्थानिकांकडून सांगितले जात आहे.

वनविभागाने ३० जानेवारी रोजी किरकोळ स्वरूपाचा गुन्हा दाखल केल्याचे कागदोपत्री दाखवले असले तरी प्रत्यक्षात कोणतीही यंत्रसामग्री जप्त करण्यात आलेली नाही किंवा दंड आकारण्यात आलेला नसल्याचा आरोप आहे. वनहद्द दर्शविणारे सिमेंट पिलर असूनही त्यांच्या आतील भागात मोठ्या प्रमाणात उत्खनन झाल्याचे दिसून येते. वनजमिनीत शेतकऱ्यांना पाईपलाईन टाकण्यासाठीही कडक नियम असताना, एवढ्या मोठ्या अतिक्रमणाकडे दुर्लक्ष का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. या प्रकरणात राजकीय दबावामुळे कारवाई टाळली गेल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

याबाबत मंचर येथील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता जप्त मशिनरी कुठे ठेवली आहे याची माहिती देण्यात आली नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क होऊ शकला नाही.या प्रकारामुळे वनविभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून सखोल चौकशीची मागणी होत आहे.


### जाहीर नोटिस

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग ग्रामपंचायत सरदवाडी, ता. शिरूर, जी.पुणे**

सरपंच ग्रामपंचायत सरदवाडी, ता. शिरूर हे जिल्हा परिषद कडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन **Percentage rate tender** दोन लिफाफा पध्दतीने पुढील कामाची जाहीर निविदा मागवित आहेत.

| अ. नं. | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा फी | बयाणा रक्कम | अवश्यक ठेकेदार वर्ग | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | निरवाने वस्ती–जाधव वस्ती १ बंदिस्त गटर लाइन करणे. | २९९८७०/– | २३६/– | सूट | जि.प नोंदणीकृत सु.बे.अ. | ६ महिने |
| २ | निरवाने वस्ती–जाधव वस्ती २ बंदिस्त गटर लाइन करणे. | २९९९२०/– | २३६/– | सूट | जि.प नोंदणीकृत सु.बे.अ. | ६ महिने |

१) सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ग्रामपंचायत **सरदवाडी**, ता. शिरूर कार्यालय येथे होईल. सदर निविदेसंदर्भात निविदा नोटिस प्रसिद्धी, सूचना, शुद्धीपत्रके इ. माहिती ग्रामपंचायत करणे **सरदवाडी**, कार्यालय येथील नोटिस बोर्डवर उपलब्ध आहे. २) वरील कामाची निविदा प्रपत्रे ग्रामपंचायत कार्यालय येथे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती इ. ग्रामपंचायत **सरदवाडी**, कार्यालय येथे दिनांक ०५/०३/२०२६ रोजी १०.०० वा ते दिनांक १०/०३/२०२६ चे ३.०० वा. पर्यंत ग्रा.पं.तिने प्रमाणित केलेले कारे निविदा फॉर्म विक्री करणेत येतील. ३) वरील कामाच्या सिलबंद निविदा दिनांक ०५/०३/२०२६ रोजी १०.०० वा ते दिनांक ११/०३/२०२६ चे ३.०० वा. पर्यंत ग्रामपंचायत सरदवाडी, कार्यालयात सादर करता येतील. ४) ग्रामपंचायत मार्फत उपलब्ध करून दिलेल्या निविदा फॉर्म सोबतच्या सूचना पत्रामधील अटी व शर्ती निविदाधारकास बंधनकारक राहतील. ५) जाहिर निविदा दि. १२/०३/२०२६ रोजी सकाळी ९.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात उघडणेत येतील. सदर दिवशी जाहिर निविदा उघडणे शक्य न झाल्यास कार्यालयाच्या वेळेच्या सोयीनुसार उपडणेत येतील.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**ग्रामपंचायत सरदवाडी, ता. शिरूर, जि.पुणे**


## कोरेगाव भीमात चाकूने वार करुन कामगाराला लुटले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** कोरेगाव भीमा (ता. शिरुर) येथे कंपनीत चाललेल्या कामगाराला दुचाकी आडवी लावून चाकूने वार करुन त्याच्या जवळील पैसे व पाकीट लुटल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे दोन अज्ञात युवकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोरेगाव भीमा (ता. शिरुर) येथील कल्याणी फाटा रस्त्याने संजय डकरे हा त्याच्या ताब्यातील दुचाकीहून कंपनीत कामाला चाललेला असताना पाठीमागून दुचाकीहून आलेल्या दोघांनी संजयच्या दुचाकीला धक्का देऊन खाली पाडून संजयच्या छाती व हातावर वार करुन त्याच्या खिशातील पैशाचे पाकीट काढून घेऊन दोघांनी पलायन केले, याबाबत संजय माणिकराव डकरे (वय ४३ वर्षे रा. रामनगर वढू खुर्द ता. हवेली जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी दोन अज्ञात युवकांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे हे करत आहे.


### ग्रामपंचायत हर्णस ता.भोर जि.पुणे
### बी–१ निविदा सूचना –१/२०२५–२६

सरपंच ग्रामपंचायत हर्णस ता. भोर जि. पुणे येथे विविध विकास कामे करणे कामासाठी बी–१ पद्धतीने जि.प./सार्वजनिक बांधकाम यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदर यांच्याकडून निविदा बी–१ दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद लिफाफा मध्ये निविदा मागविण्यात येत आहे. दि. ०४/०३/२०२६ सकाळी.१०.०० ते ११/०३/२०२६ दु ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात बंद लिफाफा मध्ये कार्यालयीन वेळेत सादर करण्यात याव्यात. सदर लिफाफा दि १२/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उघडण्यात येतील


| अ. क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम जीएसटीसह | अंदाज पत्रकीय रक्कम जीएसटीसोडून | इसारा रकम | कोरे निविदा रकम | कामाचा काला वधी | ठेकदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हर्णस येथील सार्वजनिक शौचालय बांधणे | २९९८३३ | २५३१३७ | २५३१ | २३६/– | ३ महिने | सु.बे.अ |
| २ | हर्णस येथे आर सी सी पाईप गटर करणे | १७२०७१ | १४५८२३ | १४५८ | २३६/– | ३ महिने | सु.बे.अ |
| ३ | हर्णस येथे आर सी सी पाईप गटर करणे | १९९१७० | १६८७८८ | १६८८ | २३६/– | ३ महिने | सु.बे.अ |
| ४ | हर्णस येथे आर सी सी पाईप गटर करणे | ९२०१८ | ७७९८१ | ७८० | २३६/– | ३ महिने | सु.बे.अ |
| ५ | हर्णस येथे आर सी सी पाईप गटर करणे | १६६७९७ | ११५९३० | ११५९ | २३६/– | ३ महिने | सु.बे.अ |


**निविदा अटी व शर्ती :** १) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतिकडे राखून ठेवला आहे २) कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी) रक्कम ग्रामपंचायत हर्णस या नावाने चेक/कॅश ऑनलाईन भरून निविदा उपलब्ध होतील ३) निविदा मधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करण्यात यावेत ३) इसारा रक्कम ग्रामपंचायत हर्णस या नावाने चेक/कॅश/ऑनलाईन/डीडी लिफाफा न १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र २ उघडला जाणार नाही. ४) सर्व कागदपत्रे निविदा नोटीस मध्ये नमूद केल्याप्रमाणे सादर करण्यात यावीत.

**ग्रामपंचायत अधिकारी** — **ग्रामपंचायत हर्णस**
**उपसरपंच** — **ग्रामपंचायत हर्णस**
**सरपंच** — **ग्रामपंचायत हर्णस**


## तलावात पोहायला गेलेल्या दोन मुली बुडाल्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**





**तळेगाव ढमढेरे :** पिंपळे जगताप (ता. शिरुर) येथील तलावामध्ये कपडे धुण्यासाठी गेलेल्या महिलेसोबत गेलेल्या तिघी मुली पाण्यात बुडून दोघींचा मृत्यू होऊन एक मुलगी सुदैवाने बचावल्याची घटना घडली असून साक्षी गोरख मुरकुटे व पायल भरत पवार असे दोघी मृत मुलींचे तर दिव्या गोरख मूरकुटे असे सुदैवाने बचावलेल्या मुलीचे नाव आहे.

पिंपळे जगताप (ता. शिरुर) येथील सुरेखा मुरकुटे या भारत गॅस फाटा जवळ असलेल्या गरुडझेप अकॅडमी पाठीमागे असलेल्या तलावामध्ये कपडे धुण्यासाठी गेल्या असताना सदर महिलेच्या साक्षी व दिव्या या दोघी मुलींसह त्यांची नातेवाईक असलेली पायल पवार या तिघी मुली तलावाकडे गेलेल्या होत्या, दरम्यान तिघी मुली पाण्यामध्ये खेळत असताना त्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने तिघी बुडू लागल्याने सुरेखा मुरकुटे यांनी आरडाओरडा केला असता शेजारील नागरिकांनी धावत येत प्रथम दिव्या मुरकुटे हिला बाहेर काढले. यावेळी साक्षी व पायल दोघी पाण्यात बुडाल्या यावेळी नागरिकांनी अथक परिश्रम करत दोघींना पाण्यातून बाहेर काढत त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले मात्र सदर घटनेत दिव्या गोरख मूरकुटे (वय १२ वर्षे रा. पिंपळे जगताप ता. शिरुर जि. पुणे) हि बचावली तर साक्षी गोरख मुरकुटे (वय १० वर्षे) व पायल भरत पवार (वय १४ वर्षे रा. पिंपळे जगताप ता. शिरुर जि. पुणे) या दोघींचा मृत्यू झाला असून याबाबत पारुबाई अशोक जाधव (वय ५५ वर्षे रा. भारत गॅस फाटा, पिंपळे जगताप ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलीस हवालदार नरेश गायकवाड हे करत आहे.


### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की चिंतामणी चकोर बेळगावकर राहणार मूकबधिर विद्यालय सेक्टर नंबर २६ पुणे ४११०४४ यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे चार चाकी वाहन नंबर MH14DT4730 सदर वाहन त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी अक्षदा दिनेश सोनटक्के यांच्या नावावर सदर वाहने करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून पुढील पूर्तता करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक–०५/०३/२०२६
**अक्षता दिनेश सोनटक्के**
**राहणार फ्लॅट नंबर ५३५ सेक्टर नंबर २१**
**यमुना नगर निगडी पुणे ४११०४४**

### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की,अर्जुन बाजीराव भगत राहणार मुक्काम कुमशेत पोस्ट शिरोली बुद्रुक , तालुका जुन्नर, जिल्हा पुणे ४१०५११. यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन नंबर MH14EU2409 असा असून सदर प्रवासी वाहन त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती सुनंदा अर्जुन भगत यांच्या नावावर सदर वाहन करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून पुढील पूर्तता करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक–०५/०३/२०२६
**श्रीमती सुनंदा अर्जुन भगत**
**मुक्काम कुमशेत पोस्ट शिरोली बुद्रुक तालुका जुन्नर जिल्हा पुणे४१०५११**

### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की शशिकांत दादासाहेब कदम राहणार चिंतामणी कॉलनी वाल्हेकर वाडी चिंचवड पुणे ४११०३३ यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे दोन चाकी वाहन नंबर MH14ED5456 सदर वाहन त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती रजनी शशिकांत कदम यांच्या नावावर सदर वाहने करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून पुढील पूर्तता करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक– ०५/०३/२०२६
**श्रीमती रजनी शशिकांत कदम**
**रा.चिंतामणी कॉलनी वाल्हेकर वाडी**
**चिंचवड पुणे ४११०३३**

### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की मच्छिंद्र भिवाजी मोरे राहणार मुक्काम नागपूर चाळ, येरवडा, पुणे ४११००६ यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असणारे वाहन नंबर MH14HY7953 व MH46N 1618 असा असून सदर प्रवासी वाहने त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार मुलगा जयंत मच्छिंद्र मोरे यांच्या नावावर सदर वाहने करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही, असे समजून पुढील पूर्तता करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक–०५/०३/२०२६
**जयंत मच्छिंद्र मोरे**
**मुक्काम बारव, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे. ४१०५११**

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे पती कै. दत्तात्रय तुकाराम तिकाणे याचे दि.०७/१०/२०२२ रोजी निधन झाले. त्याच्या नावे पिंपरी–चिंचवड आर.टी.ओ. मध्ये नोंद असलेल्या तीन टु व्हिलर गाड्याखालील प्रमाणेः (१) Honda Activa गाडी नं.MH 14 - DG 1783 **चॅसिज नं.** ME4JC448 BC7238054 **इंजिन नं.** JC44E 5237427, (२) Honda Unicorn गाडी नं.MH 14 - BQ 9125 **चॅसिज नं.** ME4KC093M8829859 **इंजिन नं.** KC09E1030445 (३) Honda Splender गाडी नं.MH 14 - HP 1397 **चॅसिज नं.** MBLHARO7XKHA03917 **इंजिन नं.** HA10AGKHA85326 असा आहे. कायदेशीर वारसदार म्हणून मी माझ्या नावे सदर वाहन हस्तांतर करण्यास उप–प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी–चिंचवड कार्यालय यांच्याकडे कागदपत्रे सादर करीत आहे. सदर वाहनासंदर्भात जर कोणाचीही कसलीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आत लेखी स्वरुपात कळवावे. अन्यथा आपल्यापैकी कोणाचीही कसलीही तक्रार नाही. असे गृहित धरुन सदर वाहन मी माझ्या नावे हस्तांतर करून घेत आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

**श्रीमती राजश्री दत्तात्रय तिकाणे**
रा.सर्व्हे नं.२६/५, गुरुदत्त नगर पिंपळेगुरव, पुणे – ४११ ०२७
मो.8421821603

# सेवानिवृत्त सैनिकाकडून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : तालुक्यातील नगर - दौंड रोडवरील एका हॉटेल व्यवसायाशी संबंधित सेवानिवृत्त सैनिकाने अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार घडला असून त्यांना रंगेहात पकडल्यावर सैनिकाच्या पत्नीसह त्या अल्पवयीन मुलीच्या नातेवाईकांनी त्या सेवानिवृत्त सैनिकाला चांगलाच चोप दिला आहे त्यानंतर परिसरात प्रचंड संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सैन्यात नोकरी करून सेवानिवृत्त झाल्यांनतर त्याने नगर - दौंड रोडवर आपला हॉटेल व्यवसाय सुरु केला त्याचबरोबर रयत शिक्षण संस्थेच्या एका शाळेत शाळेतील मुलीना मुलींना मोफत कब्बडीचे प्रशिक्षण देण्याचे काम करत होता ते पण निशुल्क त्यामुळे तो चांगली समाजसेवा करत आहे असे लोकांना वाटले असेच खेळांचे प्रशिक्षण देताना शाळेतील एक अल्पवयीन मुलगी त्याच्या संपर्कात आली आणि सेवानिवृत्त सैनिकाने प्रशिक्षण देताना तिच्याशी जवळीक निर्माण केली त्यातून त्या सेवानिवृत्त सैनिकाला त्या अल्पवयीन मुलीवर प्रेम झाले त्यातून गाडीतून फिरणे यासह विविध गोष्टी होऊ लागल्या मात्र कबड्डी प्रशिक्षक असल्यामुळे हि बाब कोणाच्याही लक्षात आली नाही असेच चालत राहिल्यावर त्या मेजरने त्या अल्पवयीन मुलीशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले असेच त्याने वेळोवेळी विविध ठिकाणी तिच्यावर अत्याचार केला हि बाब नातेवाईकाच्या लक्षात आल्यावर त्यांनी त्याच्यावर पाळत ठेवली असता त्यांना नगर दौंड रोडवरील बंद पडलेल्या हॉटेलवर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आणि मुलीच्या नातेवाईकांनी त्या मेजरला बेदम चोप दिला आणि गोंधळ उडाला या गोंधळात मेजरच्या पत्नीनेही संताप व्यक्त करत पतीला मारहाण केल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.यानंतर मेजरला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून उपचारानंतर त्यांना घरी सोडण्यात आले आहे काही काळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.हे प्रकरण मिटविण्यासाठी अनेक ठिकाणी चर्चा झाल्याची माहिती मिळत आहे असून लाखो रुपयांची तडजोड करून प्रकरण मिटविण्यात आले असून याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

### मुलीच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

रयत शिक्षण संस्थेत शाळेच्या सल्लागारपदी विराजमान असलेले सेवानिवृत्त सैनिक बेकायदेशीरपणे शाळेच्या परिसरात येऊन खेळांचे प्रशिक्षण देण्याचे बहाण्यातून मुलीवर अत्याचार करणे हि बाब अतिशय गंभीर असून याची शालेय दप्तरी कसलीही नोंद नसल्याची माहिती मुख्याध्यापकांनी दिली आहे मग ते कोणाच्या आशीर्वादाने शाळेत प्रशिक्षण देत होते याचाही शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे मात्र यामुळे मुलीच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

### गुन्हा दाखल करण्याची मागणी

शाळेत प्रशिक्षण देण्याचे बहाण्याने अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात सेवानिवृत्त सैनिकांसह शाळेतील मुख्याध्यापक यासह सर्व दोषीवर पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी जोर धरताना दिसत आहे त्यामुळे अत्याचाराला काहीसा आला बसण्यास मदत होईल असेही बोलले जात आहे.

### कायद्यानुसार गंभीर बाब

अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराचे प्रकरण हे झजउडज कायद्यांतर्गत येते आणि अशा गुन्ह्यांत तडजोड ग्राह्य धरली जात नाही. त्यामुळे जर आरोपांमध्ये तथ्य असेल, तर गुन्हा नोंद न होणे ही स्वतःमध्ये गंभीर बाब ठरू शकते, असा कायदेतज्ज्ञांचा प्राथमिक अभिप्राय आहे.

### दोषींवर कारवाई करण्यात येईल - बंडू पवार

श्रीगोंदा तालुक्यात घडलेली घटना खरी असून ती मुलगी शाळेतीलच आहे. तो मनुष्य शाळेत सरावासाठी येत होता यामध्ये संस्थेच्या मार्फत चौकशी करून कारवाई करण्यात येईल असे रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव बंडू पवार यांनी बोलताना सांगितले आहे.

## मिशन ५०० कोटी लिटर जलसाठा योजनेअंतर्गत

# टाकळीभान येथे बंधाऱ्यांची पाहणी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : येथे 'मिशन ५०० कोटी लिटर जलसाठा' योजनेअंतर्गत बंधाऱ्यांची पाहणी करण्यात आली. या उपक्रमाचे संकल्पक डॉ. उज्ज्वल कुमार चव्हाण (चाळीसगाव) यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक विनोद धनवटे यांनी शेतकऱ्यांसमवेत विविध बंधाऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली.

कोकणे वस्ती येथे आयोजित बैठकीत ग्रामस्थ, पदाधिकारी व शेतकरी यांच्यात सकारात्मक चर्चा होऊन गावातील बंधारे दुरुस्त करण्याचा सर्वानुमते निर्धार करण्यात आला. योजनेअंतर्गत ओढे-नाले व बंधाऱ्यांमधील गाळ काढून खोलीकरण व रुंदीकरण करण्यात येणार आहे. सीएसआर निधीतून पोकलेन मशीन उपलब्ध करून देण्यात येणार असून डिझेल खर्च स्थानिक लोकसहभागातून उचलला जाणार आहे.गावपातळीवर पाच प्रमुखांची टीम व ३० शेतकऱ्यांची पाणी समिती स्थापन करण्यात आली आहे. टाकळीभान घूमदेव रोडलगत असलेल्या कोकणे, खंडागळे व साळुंके बंधाऱ्यांची पाहणी करण्यात आली. यापूर्वी पुणतांबा, रामपुरवाडी, रस्तापूर (ता. राहाता) तसेच गोडेगाव-नायगाव (ता. श्रीरामपूर) येथे अशाच प्रकारे जलसंधारणाची कामे यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहेत.बैठकीस सरपंच पती यशवंत रणनवरे, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, कान्हा खंडागळे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# राघोहिवरेमध्ये कथित दादागिरीविरोधात ग्रामस्थ एकवटले; कारवाईची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी** : तालुक्यातील राघोहिवरे गावात एका व्यक्तीच्या कथित दादागिरीमुळे आणि त्रासदायक वर्तनामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या प्रकरणी गावातील पीडित नागरिकांनी एकत्र येत पोलिस निरीक्षक तसेच तहसीलदार यांच्याकडे लेखी निवेदन देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनानुसार, रामदास भिकजी बनसोडे हा इसम मूळ भातोडीपारगाव येथील रहिवासी असून सध्या आपल्या पत्नीच्या नावावर असलेल्या जमिनीवर राघोहिवरे येथे वास्तव्यास आहे. तो पूर्वी मुंबई महानगरपालिकेत कार्यरत होता व सध्या निवृत्त होऊन पेन्शनवर आहे. मात्र, गावात राहायला आल्यानंतर त्याच्या वर्तनामुळे स्थानिक नागरिकांना सातत्याने त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सदर इसमाकडे २० ते २५ शेळ्या, दोन गायी आणि तीन पाळीव कुत्रे असून हा सर्व जनावरांचा लवाजमा तो लहान मुलाकडे चारण्यासाठी देतो. गुरे-शेळ्या इतरांच्या शेतात घालून पिकांचे नुकसान केले जात असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. शेजाऱ्यांच्या मालमत्तेचेही नुकसान होत असल्याचा आरोप आहे. याबाबत विचारणा करण्यासाठी गेलेल्या नागरिकांना तो जीवे मारण्याच्या धमक्या देतो, दमदाटी करतो आणि महिलांवरही शिवीगाळ करतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दररोजच्या उध्दट वर्तनामुळे गावातील वातावरण तणावपूर्ण झाले असून, परिस्थिती गंभीर होण्यापूर्वी प्रशासनाने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

मा. तहसीलदार तसेच संबंधित पोलिस निरीक्षक यांनी तातडीने दखल घेऊन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक बंदोबस्त करावा, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

या वेळी आबदास आरोळे, राहुल नरवडे, विलास गायकवाड, दानियल नरवडे यांनी स. पो सतिश भताने यांच्याकडे निवेदन देऊन करण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# मिरजगाव पोलिसांच्या सतर्कतेमुळे दोन हरिणांचे प्राण वाचले; पाच जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मिरजगाव** : रात्रीच्या गस्तीदरम्यान मिरजगाव पोलिसांच्या सतर्कतेमुळे दोन हरिणांचे प्राण वाचले असून वन विभागाने चार पुरुष व एका महिलेविरुद्ध वन्यजीव संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई मिरजगाव पोलीस स्टेशन हद्दीत चांदे-बिटकेवाडी जंगल परिसरात दि. ३ मार्च रोजी पहाटे चारच्या सुमारास करण्यात आली.

मागील काही दिवसांत घरफोडी व चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक नेमण्यात आले होते. गस्तीदरम्यान दोन मोटारसायकलींवर संशयित हालचाली करणारे चार पुरुष व एक महिला आढळले. पोलिसांनी पाठलाग करताच



एका मोटारसायकलवरील दोघांनी गाठोडे व वाहन सोडून अंधाराचा फायदा घेत पळ काढला, तर दुसरी मोटार सायकलही पसार झाली.

सदर गाठोड्यात तीन हरिण आढळून आले. त्यांचे पाय व तोंड बांधलेले होते. त्यापैकी दोन हरिण जिवंत तर एक मृत अवस्थेत होते. जिवंत हरिणांपैकी एकाला तत्काळ नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी संकेत उगले व त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

घटनास्थळावरून हिरो कंपनीची मोटारसायकल, जाळी, दोरी, शाल व मोबाईल हस्तगत करण्यात आला. वन विभागाने वन्यजीव संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. पोलिस व वन विभागाच्या संयुक्त कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# तारकपूर बसस्थानकात बेकायदा वावर

## रात्री प्रवाशांऐवजी टवाळखोरांची गर्दी

**अहिल्यानगर** : शहरातील तारकपूर बसस्थानक परिसरात रात्रीच्या वेळी प्रवाशांपेक्षा टवाळखोर, व्यसनी आणि अनधिकृत वावर करणाऱ्यांची गर्दी वाढत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. चहापाणी, सिगारेट, तंबाखू आदी कारणांनी येथे दररोज उशिरापर्यंत 'रात्रीचा बाजार' भरत असल्याचा आरोप होत असून, एसटी प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

दिवसभर हजारो प्रवाशांची वर्दळ असलेल्या या बसस्थानकाचे चित्र रात्री पूर्णपणे बदलते. विविध भागांतून येणारी तरुणांची टोळकी, मद्यपी, सिगारेट व तंबाखू सेवन करणारे तसेच विनाकारण परिसरात थांबणारे घटक मोठ्या प्रमाणात येथे जमतात. त्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि रात्री प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

बसस्थानक परिसरात थुंकीचे डाग, प्लास्टिक कप, चहाचे ग्लास, सिगारेटची थोटके यांचा साचलेला कचरा दिसून येतो. दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे सकाळच्या प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. स्वच्छतेबाबत केवळ औपचारिकता होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. रात्रीच्या वेळी होणाऱ्या भांडणांमुळे आणि संशयास्पद हालचालींमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर नियमित पोलिस गस्त, अचानक तपासण्या आणि अनधिकृत टपऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

बसस्थानक हे प्रवाशांचे सुरक्षित ठिकाण असायला हवे; मात्र सध्या परिस्थिती चिंताजनक बनली असून, प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## बालविवाह मुक्त भारत अभियानांतर्गत

# जनजागृती कार्यक्रम उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : श्री शिवाजीराव नागवडे विधी महाविद्यालय, जिल्हा व सत्र न्यायालय श्रीगोंदा तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने 'बालविवाह मुक्त भारत' या शंभर दिवसीय अभियानांतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दि. २ मार्च २०२६ रोजी सोनिया गांधी पॉलिटेक्निक महाविद्यालय येथे हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. अंजुला चौबे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून एस. पी. गोलांडे व प्राचार्य अमोल नागवडे उपस्थित होते. प्रा. पी. जे. फाटे व प्रा. रुपाली गोळे यांनीही मार्गदर्शन केले.

विद्यार्थी सागर पाटोळे यांनी सूत्रसंचालन केले. पॅरा लीगल स्वयंसेवक रूपेश पोखरकर यांनी बालविवाहाचे दुष्परिणाम व अभियानाची उद्दिष्टे स्पष्ट केली. अजय भापकर यांनी लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण (पॉक्सो) कायद्याबाबत माहिती दिली. साक्षी मचले यांनी लोकन्यायालय संकल्पना व तिचे फायदे विशद केले.

कार्यक्रमातून अल्पवयीन विद्यार्थ्यांमध्ये कायद्याबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. प्रा. रुपाली गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. बालविवाह निर्मूलनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज मान्यवरांनी व्यक्त केली.




# पायी दिंडीचे चिचोंडी येथे भव्य स्वागत



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी** : एमआयडीसी अहिल्यानगर ते मढी मायंबा या पायी दिंडीचे चिचोंडी येथे फटाक्याच्या आतिश बाजी ने भव्य दिव्य स्वागत भगवान बाबा मंदिर येथे करण्यात आले

यावेळी या स्वागताला ज्येष्ठ नेते पद्माकर दादा आव्हाड घनश्याम आव्हाड ह भ प तुळशीदास पालवे उद्योगपती विठ्ठल शेठ पालवे जांबुवंत पालवे बाळासाहेब गीते संतोष पालवे, टिंबू पालवे राजेंद्र गरुड शुभम गरुड अभी मोहिते पत्रकार रमेश पाथरकर कमलेश गुगळे भागवत रोमन गोटीराम आव्हाड नवनाथ जराड रमेश जराड रावसाहेब कांबळे आदी उपस्थित होते

नाथ भक्त अशोक भाऊ पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली या पायी दिंडीचे आयोजन करण्यात येते ही दिंडी जेऊर उदलमल कोलार चिचोंडी राघो हिवरे मांडवा तिसगाव मढी मायंबा येवलेवाडी या ठिकाणी दिंडी जाते या दिंडीमध्ये नाथ भक्त बालगोपाळ महिला मोठ्या संख्येने सहभागी असतात

यावेळी नाद भक्त अशोक महाराज उपदेश पर बोलताना म्हणाले हिंदू धर्म टिकला पाहिजे हिंदू संघटित झाला पाहिजे तसेच चिचोंडी येथे आनंद धाम या ठिकाणी अशोक महाराज यांनी प्रवीण ऋषीजी महाराज यांची सदिच्छा भेट घेऊन हिंदू धर्मावर तासभर चर्चा केली

यावेळी प्रवीण ऋषीजी महाराज म्हणाले की आपण असेच कार्य करावे असे म्हणाले

ही दिंडी वाजत गाजत मढीच्या दिशेने मार्गस्थ झाली.

# पल्लवी पुराणेची स्टेट बँक ऑफ इंडियात ज्युनिअर असोसिएटपदी निवड

**मिरजगाव** : कर्जत तालुक्यातील बाभूळगाव खालसा येथील कु. पल्लवी दादासाहेब पुराणे हिने बँकिंग क्षेत्रातील स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत डींरींश इरपज्ञ ेष खपवळर मध्ये ज्युनिअर असोसिएट पदासाठी पात्रता मिळवली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातून येणाऱ्या पल्लवीचे हे यश प्रेरणादायी ठरत आहे.

भारतीय बँकिंग क्षेत्रातील भरती प्रक्रिया राबविणाऱ्या इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सनल सिलेक्शन या स्वायत्त संस्थेमार्फत २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत तिने यश मिळवले. त्यानुसार देशातील अग्रगण्य सार्वजनिक क्षेत्रातील बँकेत तिची निवड निश्चित झाली.

या यशाबद्दल मिरजगाव येथील कृषी उत्पन्न उपबाजार समितीत तिचा सत्कार करण्यात आला. कर्जत तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर, सचिव विकास तनपुरे व मान्यवरांच्या हस्ते शाल-श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. पल्लवी ही मिरजगाव उपबाजार समितीचे कर्मचारी दादासाहेब पुराणे यांची कन्या आहे.



**श्री स्थानकवासी जैन संघ, श्रीरामपूर**

रजि.नं.एएच १६८

**जाहीर खुलासा**

श्रीरामपूर मधील श्री स्थानकवासी जैन संघ मधील श्रावक व श्राविका यांना कळविणेत येते की, स्वयंघोषित आदर्श महिला मंडळ व आदर्श बहुमंडळ यांना आमच्या ट्रस्टने कधीही मान्यता दिलेली नव्हती व नाही त्यांचे रजिस्टर मंडळ असून त्या वर्गणी घेऊन त्यांचा मंडळ चालवित आहे. तेव्हा जैन स्थानकाची जागा वापरण्यास देणेचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यांनी त्यांची व्यवस्था वेगळी करावी. नाही तरी ते हे मंडळ चार्तुमासात जैन स्थानकात अजिबात उपयोगी पडत नाही. कळावे.

– रमेश इंद्रभान लोढा

## द•ख•ल

### घारगाव सोसायटीच्या चेअरमनपदी रमेश कळमकर बिनविरोध




**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यातील सहकार क्षेत्रातील नावाजलेल्या हनुमान घारगाव वि.वि. कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमन पदी राहुल दादा जगताप समर्थक खादी ग्रामोद्योग मंडळाचे संचालक रमेश कळमकर यांची बिनविरोध निवड महाराष्ट्र राज्य पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व संचालक माधव जगताप बापूराव शिंदे राधाबाई पानसरे कविता मोळक व्हा. चेअरमन संपत महाराज कुचेकर सचिन खडके सुरेश बांदल दत्तात्रय दशरथ पानसरे नारायण खामकर पोपट शेंडगे यांच्या सहमतीने करण्यात आली. मावळते चेअरमन माधव जगताप यांनी राजीनामा दिल्याने रिक्त जागेवर दत्तात्रय पानसरे यांनी सर्वांना बरोबर घेऊन चालण्याच्या हेतूने रमेश कळमकर यांची निवड केली. यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून मुंढे यांनी काम पाहिले व त्यांना संस्थेचे सचिव धनंजय पवार यांनी सहकार्य केले.

### संजय कोठारी यांच्या वाढदिवसानिमित्त निबंध व चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण



**जामखेड** : तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांच्या ६३ व्या वाढदिवसानिमित्त निबंध व चित्ररेखन स्पर्धेच्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोन दिल्ली, कोठारी प्रतिष्ठान जामखेड व समर्थ हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने जामखेड येथील ल. ना. होशिंग विद्यालयात या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमावेळी जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी म्हणाले की, तालुक्यात अपघात घडताच सर्वप्रथम मदतीसाठी संजय कोठारी धाव घेतात. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करून जीव वाचविण्याचे कार्य ते करतात. त्यांच्या सामाजिक कामामुळे प्रशासनालाही मोठी मदत होते.

स्पर्धेत सुमारे ७०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. चित्रकला स्पर्धेत पाचवी ते दहावीतील १९ विद्यार्थ्यांना, तर निबंध स्पर्धेत पाचवी ते नववीतील १५ विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

### आठ वर्षांच्या अली कुरेशीचा पहिला रोजा पूर्ण



**मिरजगाव** : मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान महिन्याला प्रारंभ झाला असून उपवास, नमाज आणि प्रार्थनेतून भक्तीभाव व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर मिरजगाव येथील अवघ्या आठ वर्षांच्या अली सादिक कुरेशी या चिमुकल्याने बुधवारी (दि.४ मार्च) आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण करत सर्वांचे लक्ष वेधले.

पहाटे ५.३६ वाजता सहेरी करून अलीने उपवासास सुरुवात केली. दिवसभर कडक उन्हाळा, तहान आणि भूक सहन करत त्याने सायंकाळी ६.३७ वाजेपर्यंत अन्न-पाण्याचा त्याग केला. लहान वयातही त्याने जिद्द आणि श्रद्धेने रोजा पूर्ण केला.

सायंकाळी इफ्तारच्या वेळी कुटुंबीयांसमवेत रोजा सोडल्यानंतर नमाज पठण करून देशातील सर्व नागरिकांच्या आरोग्य व कल्याणासाठी प्रार्थना केली. एवढ्या कमी वयात दाखवलेली शिस्त, संयम आणि भक्तीभाव पाहून परिसरातून अलीचे कौतुक होत आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
गुरुवार, दि.०५ मार्च २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## निमगाव वाघा येथे महाराष्ट्र केसरीसाठी जिल्हा निवड चाचणी




**अहिल्यानगर :** महाराष्ट्र केसरी किताबासाठी २०२५–२६ हंगामातील वरिष्ठ राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेकरिता जिल्हा व शहर संघ निवड चाचणीचे आयोजन निमगाव वाघा (ता. नगर) येथे करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य भारतीय शैली कुस्ती संघ यांच्या मान्यतेने ही चाचणी शनिवार, दि. ७ मार्च रोजी होणार असून कुस्तीपटूंनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक नाना डोंगरे यांनी केले आहे. प्रकाश बापू जगताप प्रतिष्ठान यांच्या वतीने दि. १२ ते १५ मार्चदरम्यान सासवड (जि. पुणे) येथे मातीवरील महाराष्ट्र केसरी स्पर्धा होणार आहे. त्यासाठी जिल्हा संघाची निवड या चाचणीतून केली जाणार आहे. स्पर्धा ५५ ते ९० किलो तसेच महाराष्ट्र केसरी गटासाठी ८५ ते १४० किलो वजन गटात होईल. प्रत्येक गटातून एक, तर मुख्य गटातून दोन खेळाडू निवडले जातील. सहभागींसाठी किमान वय २० वर्षे आवश्यक असून आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

# राहाता बसस्थानकात चालक, वाहकाला पोलिसांकडून मारहाण

### ✻ राहाता पोलिसांना शिविगाळ परत अॅट्रॉसिटीची धमकी
### ✻ येवला येथील हेड कॉन्स्टेबलसह चौघांवर गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शिर्डी :** उदगीर बस डेपो चे कर्मचारी राहाता बसस्थानकात आपली बस घेऊन आले असता तेथे उपस्थित असलेल्या येवला येथील पोलीस हेडकॉन्स्टेबलसह तिघांनी बस चालक व वाहकाशी हुज्जत घालत त्यांना जबरी मारहाण केली. राहाता पोलीसांनाही शिवीगाळ केल्याने याप्रकारणी चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक १ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजेचे सुमारास फिर्यादी चालक विकास बालाजी मुंढे असे त्याचे ताब्यातील एस टी बसक्रमांक एम एच २४ ए यु ७९७० ही घेवुन राहाता बसस्थानक येथे आले असता नाशिक जिल्ह्यातील येवला पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोहेकों फकिरा तोताराम थोरात, सार्थक संजय बनसोडे (रा साकुरी ता राहाता) यांनी फिर्यादी चालक विकास मुंढे यांना शिविगाळ, दमबाजी करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच फोन करुन त्यांचे इतर दोन साथिदार यांना बोलावुन घेवुन त्याच्याबरोबर मिळुन पुन्हा मारहाण केली.

सदर मारहाणीत चालक विकास मुंडे यांचा सरकारी गणवेशाचा खिसा फाडलेला आहे. सदर मारहाणीत फिर्यादी व चालक विकास मुंडे यांना मार लागला आहे. तसेच पोलीसांना देखिल शिवीगाळ दमबाजी केलेली आहे. तसेच मी पोलीस आहे, तुमच्यावर तसेच पोलीस उपनिरिक्षक लेंडे व पोलीस ठाणे अंमलदार बर्डे यांना म्हणाला की मी तुम्हाला सर्वांना कामाला लावुन टाकेल व तुमच्यावर ट्रोसिटीचा गुन्हा दाखल करेन अशी धमकी दिली व फिर्यादी हे शासकीय कर्तव्य पार पाडत असतांना अडथळा निमर्ण केल्याच्या फिर्यादीवरुन पोहेकों फकिरा तोताराम थोरात, सार्थक संजय बनसोडे व इतर दोघांविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम १३२, १ १२१( १), ३५१(२), ३५२व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक कुमावत या करत आहेत.

# अवैध धंद्यांचे कंबरडे मोडणार
## लवकरच विशेष ‘हेल्पलाईन’ : ना. विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव:** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अवैध धंदे आणि गुन्हेगारी प्रवृत्तींना मिळणारा आश्रय मोडून काढणे काळाची गरज आहे. नागरिकांमधील भीती दूर करण्यासाठी आणि त्यांना थेट प्रशासनाशी जोडण्यासाठी लवकरच एक विशेष हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित करण्यात येईल. या माध्यमातून तक्रार करणाऱ्या नागरिकांची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवून कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याच्या नूतन इमारतीचे आणि पोलीस अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या ६४ निवासस्थानांच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पोलीस दलासाठी चार अत्याधुनिक फॉरेन्सिक लॅब व्हॅनचेही लोकार्पण करण्यात आले.

पोलीस दलाचे सक्षमीकरण आणि आधुनिकता पालकमंत्री पुढे म्हणाले की, राज्य शासन पोलिसांच्या कल्याणासाठी कटिबद्ध असून जिल्ह्यात विविध ठिकाणी निवासस्थानांची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. समृद्धी महामार्ग आणि राष्ट्रीय महामार्गांमुळे वाढणारी अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी जिल्ह्यात ५०० अतिरिक्त पोलीस कर्मचाऱ्यांची मागणी शासनाकडे केली आहे.

गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यातील महाविद्यालय परिसर आणि ग्रामपंचायतींमध्ये सीसीटीव्ही बसवण्यावर भर दिला जाणार आहे. तपासाला गती मिळावी यासाठी उपविभागीय स्तरावर अत्याधुनिक फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून दिल्या आहेत.

या कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरूपात पाच पोलीस कर्मचाऱ्यांना घरांच्या चाव्या सुपूर्द करण्यात आल्या. कार्यक्रमाला पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

\- - - - - - - - -

**तालुक्यातील अवैध धंदे आणि गावठी दारू विक्रीवर कठोर कारवाई करण्याची गरज आहे. चुकीची माहिती पसरवून समाजाची दिशाभूल करणाऱ्या प्रवृत्तींना आळा घातला पाहिजे.**

**– आमदार आशुतोष काळे**

## सोनई-लांडेवाडी परिसरात बिबट्याचे वास्तव्य; नागरिकांमध्ये भीती



**सोनई :** सोनईलांडेवाडी रस्त्यावरील लिपाने वस्ती परिसरात गेल्या आठ दिवसांपासून बिबट्याने मुक्काम ठोकल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी वारंवार दर्शन देत असल्याने ग्रामस्थांना जागरण करावे लागत असून, शेतीकामांवरही परिणाम होत आहे. डॉ. ज्ञानेश्वर माऊली दरंदले यांनी मित्रांसह उसाच्या शेतात ट्रॅक्टरने पाठलाग केल्यावर बिबट्याने धूम ठोकल्याची घटना घडली. रात्री आठच्या सुमारास रमेश लिपाने व अन्य नागरिकांना बिबट्याचे दर्शन झाले. यापूर्वी दरंदले यांच्या घरासमोरील कुत्र्याचा बिबट्याने फडशा पाडला असून काही शेळ्यांनाही जखमी केल्याची माहिती आहे. पहाटे फिरायला गेलेल्या काही नागरिकांसमोर बिबट्या आडवा गेल्याने ते जीव मुठीत धरून घरी परतले. त्यामुळे रात्री आठनंतर घराबाहेर पडण्यास नागरिक घाबरत आहेत. परिसरातील वीजपुरवठा अखंडित ठेवावा व वन विभागाने तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी डॉ. दरंदले व रमेश लिपाने यांनी केली आहे.

# वांगी बु. ग्रामपंचायत उपसरपंचांवरील अविश्वास ठराव रद्द

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील वांगी बु. ग्रामपंचायतीच्या उपसरपंच सौ. प्रभावती ज्ञानेश्वर लकडे यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेला अविश्वास ठराव तहसीलदारांनी रद्द केला. सहा सदस्यांनी २६ फेब्रुवारी २०२६ रोजी तहसीलदारांकडे अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. त्यावर निर्णय घेण्यासाठी तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी २ मार्च रोजी विशेष बैठक बोलावली होती.

बैठकीस सहा सदस्यांपैकी तीन सदस्य गैरहजर राहिल्याने प्रस्ताव संमत करण्यासाठी आवश्यक बहुमत पूर्ण झाले नाही. परिणामी, उपसरपंच सौ. लकडे यांच्यावरील अविश्वास ठराव तहसीलदारांनी नामंजूर केला.

दरम्यान, ग्रामपंचायतीचा कारभार समाधानकारकपणे सुरू असल्याचा दावा करत कल्याण लकडे यांनी विरोधकांवर विकासकामांत अडथळे आणण्याचा आरोप केला. आदिवासी घरकुल योजना, दलित वस्ती सुधारणा, स्मशानभूमी विकास, रस्ते व पाणीपुरवठा योजनांबाबत खोट्या तक्रारी केल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. निवडणुकीतील पराभव न पचवता बदनामीचा प्रयत्न सुरू असल्याचाही आरोप त्यांनी केला.

यापूर्वीही काही सदस्यांच्या सदस्यत्वाबाबत तक्रारी करण्यात आल्या होत्या; मात्र चौकशीनंतर त्या निकाली काढण्यात आल्याचे लकडे यांनी स्पष्ट केले. बैठकीस ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ओला स्कूटरच्या वादातून तरुणावर कोयत्याने प्राणघातक हल्ला; आरोपी अटकेत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** शहरातील फुलेवाडी रोड परिसरात मंगळवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास ओला इलेक्ट्रिक स्कूटरच्या वादातून एका तरुणावर कोयता व सुऱ्याने जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात प्रितेश साळुंके हा तरुण गंभीर जखमी झाला असून पोलिसांनी आरोपी कमलेश मनसुब खटकाळे याला शस्त्रांसह अटक केली आहे.

याबाबत भूषण गोविंद ठोंबरे (वय २१, रा. एन.एम.सी. कॉलनी) यांनी वैजापूर पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली आहे. ठोंबरे यांच्या म्हणण्यानुसार, साधारण महिनाभरापूर्वी कमलेश खटकाळे याने त्यांची ओला इलेक्ट्रिक स्कूटर दुरुस्तीच्या कारणावरून नेली होती. मात्र, ती गाडी अन्यत्र गहाण ठेवून १५ हजार रुपये उचलल्याचा आरोप आहे. वारंवार मागणी करूनही गाडी परत न मिळाल्याने ३ मार्च रोजी ठोंबरे मित्रांसह आरोपीच्या घरी गेले असता वाद झाला.

वादानंतर आरोपीने घरातून कोयता व सुरा आणून आज हिशोब करतो अशी धमकी देत हल्ला चढवला. जीव वाचवण्यासाठी पळापळ सुरू असताना प्रितेश साळुंके याच्यावर पाठीमागून कोयत्याने वार करण्यात आला. कमरेखालील भागात गंभीर दुखापत झाल्यानंतर सुऱ्यानेही वार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

घटनेनंतर परिसरात घबराट पसरली होती. दरम्यान, पोलिसांनी तत्काळ धाव घेत आरोपीचा पाठलाग करून चंद्रपाल नगर भागातून त्याला ताब्यात घेतले. जखमी प्रितेश साळुंके याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध जीवे मारण्याच्या प्रयत्नासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## दिराने केली भावजईला मारहाण

**श्रीरामपूर :** शहरातील वॉर्ड क्रमांक २ मधील बाबरपुरा परिसरात कौटुंबिक वादातून दिराने भावजईला मारहाण करून चाकू दाखवत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत समरीन निसार शेख यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, त्या दुपारी सुमारे ३ वाजता घरी जेवण करत असताना त्यांचा दिर इम्रानु इसाक शेख हा घरी आला. कोणतेही ठोस कारण नसताना त्याने समरीन यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. शिवीगाळ का करता? असा जाब विचारल्याने संतप्त होऊन त्याने लाकडी दांडक्याने त्यांच्या पाठीवर मारहाण केली.

त्यानंतर चाकू दाखवत आज तू वाचलीस, पुन्हा जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देऊन तो तेथून निघून गेला, असे फिर्यादीत नमूद आहे.

या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी आरोपी इम्रान शेख याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# शिर्डीत २५ लाखांचा मांगूर पकडला

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** केंद्र सरकारने प्रतिबंधित केलेला सुमारे ४००० किलो मांगुर मासा जप्त करण्यात आला असून, ट्रकसह एकूण २९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि. दिपक मेढे व त्यांच्या पथकाने शिर्डी परिसरात गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचला. दिनांक ३मार्च रोजी निमगाव बायपास रोड, नगर–मनमाड महामार्ग येथे ट्रक क्रमांक थइ२५च५०२३ ताब्यात घेण्यात आला. ट्रकमध्ये प्रतिबंधित मागुर मासा आढळून आला. ट्रकमधील चार आरोपींनी सदर मासा पश्चिम बंगाल येथून भरून खोपोली–मुंबई येथे नेण्याची कबुली दिली.

त्यानंतर ट्रक शिर्डी पोलीस ठाणे येथे आणून मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी सौ. प्रतिक्षा सुधाकर पाटेकर यांनी पाहणी केली असता, तो मासा केंद्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या आफ्रिकन मागुर जातीचा असल्याचे स्पष्ट केले. जप्त केलेले मासे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पंचांसमक्ष ब्लिचिंग पावडर व मीठ टाकून जमिनीत पुरून नष्ट करण्यात आले.

स्वपन नियम डे (वय ३६) मकबुल रौफ सरदार (वय ३१) कुतुब आयुब मंडल (वय ३५) मृत्युंजय मुकुल विश्वास (वय २७) तर मिराज (प. बंगाल) व इमाम भाई (मुंबई) हे दोघे फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

सदर कामगिरी पोउपनि. दिपक मेढे, पोलीस अंमलदार राहुल द्वारके, पोलीस अंमलदार शाहिद शेख, पोलीस अंमलदार फुरकान शेख, पोलीस अंमलदार राहुल डोके,

पोलीस अंमलदार सुनिल मालणकर, पोलीस अंमलदार प्रशांत राठोड, पोलीस अंमलदार सतिष भवर, चालक उमाकांत गावडे, उत्तरेश्वर मोराळे तसेच शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे, पोउपनि. सागर काळे यांनी साथ दिली.

# पाणीपट्टी दरवाढीवरून देवळालीकर एकवटले!

### ६ मार्चला सर्वपक्षीय मोर्चाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** देवळाली शहरातील पाणीपट्टी दरवाढीच्या निर्णयावरून नगरपरिषदेतील राजकारण चांगलेच तापले असून सत्ताधाऱ्यांविरोधात सर्वपक्षीय आघाडी एकवटली आहे. नुकत्याच झालेल्या नगरपरिषद बैठकीत पाणीपट्टी दर थेट १८०० रुपयांवरून ३००० रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आल्याने नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे.

नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी भाजपवर विरोधकांनी मनमानी कारभार केल्याचा आरोप करत जोरदार टीका केली. वाढीव पाणीपट्टी विरोधात ६ मार्च रोजी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

सत्ताधारी वगळता सर्वपक्षीय नेते, शिंदे गट, विविध स्थानिक संघटना तसेच प्रहार जनशक्ती आदी संघटनांनी एकत्र येत काल मंगळवारी पत्रकार परिषदेल घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

६ मार्च २०२६ रोजी देवळाली नगरपरिषद कार्यालयावर भव्य आंदोलन करण्याची घोषणा यावेळी करण्यात आली आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना विरोधी नेत्यांनी ही दरवाढ सर्वसामान्यांच्या खिशावर थेट घाला आहे. पाणीपुरवठ्यात सुधारणा नसताना दरवाढ कशाच्या आधारावर? असा सवाल उपस्थित केला. आर्थिक परिस्थितीचा विचार न करता घेतलेला हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अन्यथा जनआंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. या पत्रकार परिषदेस आरपीआय जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, काँग्रेसचे शहराध्यक्ष कृष्णा मुसमाडे, प्रहारचे आप्पासाहेब ढुस,प्रशांत मुसमाडे शिवसेना शिंदे गट नेते, दासू पठारे ,नगरसेवक शरद वाळुंज ,संतोष चोळके, शरद वाळूंज, दत्ता कडू ,अरुण ढुस वैभव गिरमे ,बाळासाहेब खांदे ,सुनील कराळे, कुमार भिंगारे,संजय मुसमाडे,अनिल चव्हाण ,संजय कदम, राजेश मंचरे ,प्रतीक फुलपगार,विक्रम फाटे ,संगम रसाळ,नानासाहेब उंडे ,गणेश भालके यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भरदिवसा घरात घुसून विद्यार्थ्यावर कोयत्याने वार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** राहुरी तालुक्यातील मुसळवाडी येथे भरदिवसा घरात घुसून शाळकरी मुलावर कोयत्याने वार केल्याची धक्कादायक घटना ३ मार्च रोजी दुपारी ४ वाजेच्या दरम्यान घडली आहे. याबाबत अज्ञातांविरोधात राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान हल्लेखोर हे जवळच्या सीसीटीव्हीत कैद झाले असून त्यानुसार पोलीस तपास करत आहे.

याबाबत कृष्णा सीताराम भुजाडी(रा.मुसळवाडी, ता.राहुरी) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीत म्हटले की, ३ मार्च रोजी कृष्णा भुजाडी यांचा मुलगा साई(वय–१४) हा घरात असताना घराच्या पाठीमागून अज्ञात दोघे जण आले.त्यांनी साई याचे तोंड दाबून कवळी मारण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी त्यांच्यातील एकाने कोपऱ्याने मारून लोटून देत घरात जात असताना दुसऱ्याने साई भुजाडी याच्या उजव्या पायाच्या बोटावर कोयत्याने वार करून जखमी केले. याबाबत दोन अज्ञातांविरोधात राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नितीन सप्तर्षी हे करीत आहे.